म. ग्रं. सं. ठाणें

विषय: कृ. प्रवास

संग्रहालय क्रमांक: ७५

३०

सन

लेखक: गव्हर्नमेंट सेंट्रल बुक डेपो.

पुस्तकाचें नांव: महाराष्ट्र देशीय

सं

मह

श

वास )

Published for the Educational Department.

# CATECHISM

OF THE

# GEOGRAPHY AND HISTORY

OF

# MAHÁRÁSHTRA,

TRANSLATED INTO MARÁTHI.

---

**THIRTEENTH EDITION.**

---

REVISED BY THE

MARÁTHI TRANSLATOR.

*Registered under Government of India's Act XXV. of 1867.*

---

Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1870.

*Price Two Annas.*

Published for the Educational Department.

# CATECHISM

OF THE

# GEOGRAPHY AND HISTORY

OF

# MAHÁRÁSHTRA,

TRANSLATED INTO MARÁTHI.

---

**THIRTEENTH EDITION.**

---

REVISED BY THE

MARÁTHI TRANSLATOR.

*Registered under Government of India's Act XXV. of 1867.*

---

Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

---

1870.

*Price Two Annas.*

मुंबईमध्ये
एज्युकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

...... नं. ......

# महाराष्ट्र देशाचें वर्णन

आणि

इतिहास ह्यांचा

प्रश्नोत्तरावलिरूपग्रंथ

शाळाखात्याकरितां केला.

आवृत्ति तेरावी.

मुंबई

गवर्मेन्त सेंत्रल बुक डीपो.

सन १८७०.

पुस्तक सन १८६७ चा आक्त २५ प्रमाणें नोंदलें आहे.

---

शके १७९२.

किंमत दोन आणे.

# सूचना.

ह्या ग्रंथाचे तीन भाग केले आहेत. पहिल्या भागांत देश, नद्या, डोंगर, गांव, शहरें, प्रांत, सुभे इत्यादिकांचें वर्णन आहे, दुसऱ्या भागांत महाराष्ट्र देशांतील प्राचीन इतिहासाचें कांहीं वर्णन आहे. तिसऱ्या भागाचीं दोन प्रकरणें आहेत; त्यांमध्यें पहिल्या प्रकरणांत शिवाजी राजा आदिकरून राजांचें वर्णन, आणि दुसऱ्या प्रकरणांत बाळाजीपंत पेशव्यापासून बाजीराव पेशव्यापर्यंत पेशव्यांचें वर्णन आहे.

हा ग्रंथ यथामति मराठी भाषेंत उतरला आहे. ह्यांत शब्दाविषयीं आणि अर्थाविषयीं दोष असतील त्यांची सुज्ञ पुरुषांनीं क्षमा करावी ही प्रार्थना आहे.

हा ग्रंथ प्रथम ग्रांत दफ साहेब ह्यांच्या मराठी बखरेचा संक्षेप करून विद्यार्थी मुलांस थोडक्यांत सर्व विषय समजावा ह्मणून दे. अ. इजदेल साहेब ह्यांनीं इंग्रजी भाषेंत केला. त्याचें मराठी भाषांतर सरकारी इंग्रजी शाळेंतील विद्यार्थी कुशाबा लिमये ह्यांनीं करून तो ग्रंथ विद्येचे मर्मज्ञ, आणि विद्येच्या वृद्धीविषयीं परम दक्ष जे मेहरबान क्यापतन क्यांदी साहेब बहादूर, पाठशाळेचे सुपरिन्टेन्डेंट, ह्यांस नजर केला आहे.

# महाराष्ट्र देशाचे वर्णन.

आणि

## मराठे लोकांचा इतिहास.

## भाग पहिला.

### महाराष्ट्र देशाचे वर्णन.

१. महाराष्ट्र देश कोणीकडे आहे?

महाराष्ट्र देश दक्षिण हिंदुस्थानांत आहे.

२. दक्षिण हिंदुस्थान ह्मणजे काय?

दक्षिण हिंदुस्थान ह्मणजे जो हिंदुस्थानाचा प्रदेश नर्मदा आणि महानदी ह्या दोहों नद्यांच्या दक्षिणेस आहे तो.

३. दक्षिण हिंदुस्थानाच्या कोणत्या बाजूस महाराष्ट्र देश आहे?

दक्षिण हिंदुस्थानाच्या वायव्यदिशेकडील जो विभाग त्यास महाराष्ट्रदेश ह्मणतात.

४. महाराष्ट्रदेशाच्या सीमा कोणत्या आहेत?

त्याची मर्यादा जेथपर्यंत लोक मराठी भाषा बोलतात तेथपर्यंत आहे. त्याच्या उत्तरेस सातपुडा डोंगर आहे, आणि पूर्वेस वाईनगंगा आणि वर्धा ह्या दोन नद्या आहेत; त्याच्या आग्नेयी दिशेस माहूर गांवापासून

ह्या डोंगरांवरून कोंकणांतून दक्षिणदेशांत यावयाकरितां ज्या ठिकाणीं वाटा आहेत, त्यांस घाट अशी संज्ञा आहे. दक्षिण देशाची जमीन समुद्राचे पृष्ठभागाहून तेराशें हात उंच आहे; परंतु ती जमीन पूर्वेच्या बाजूस उतरती आहे.

१०. कोंकण देशाची रुंदी किती आहे?

कोंकणदेशाची रुंदी समुद्रापासून घाटापर्यंत कितीएक ठिकाणीं दहा बारा कोस, आणि कितीएक ठिकाणीं वीस पंचवीस कोस अशी आहे.

११. महाराष्ट्रदेशांत मोठमोठया नद्या कोणत्या आहेत?

(१). महाराष्ट्रदेशाच्या उत्तरेस नर्मदा नदी आहे.

(२). खानदेशांत तापी नदी आहे. तिला दुसऱ्या लहान लहान नद्या मिळून तिचा प्रवाह पश्चिमेकडे जात आहे; त्या लहान नद्यांमध्यें गिरणा ह्मणून एक नदी प्रसिद्ध आहे.

(३). तापी नदीच्या दक्षिणेस गोदावरी नदी आहे. तिची उत्पत्ति त्र्यंबकेश्वरापासून आहे; आणि महाराष्ट्र देशांतील प्रवरानामक नदी, आणि माजरानामक नदी व आणखी दुसऱ्या लहान लहान नद्या तिला मिळून तिचा प्रवाह पूर्वेकडे जात आहे. गोदावरीच्या तीरचा जो प्रदेश आहे, त्याला गंगथडी असें ह्मणतात. हा प्रदेश आणि तापी नदीच्या तीरचा प्रदेश ह्यांच्या मध्यें चांदवडचे डोंगर मर्यादा आहेत, त्या डोंगरांतून खानदेशांत जावयाचा मार्ग आहे.

(४.) आणखी ह्यांच्या दक्षिणेस भिमानामक नदी आहे. तिची उत्पत्ति भिमाशंकरापासून आहे. ह्या नदीस साताऱ्याच्या उत्तरेस जे पर्वत आहेत, आणि गंगथडीच्या दक्षिणेस अहंमदनगराजवळचे जे पर्वत आहेत, त्यांच्यामध्यें जितक्या नद्या आहेत तितक्या मिळतात. त्यांचीं नांवें–शिनानदी, घोडनदी, इंद्रायणीनदी, मुळामुठानदी, निरानदी, आणि माणनदी. निरेचा प्रदेश पुण्याचे डोंगर आणि साताऱ्याचे डोंगर ह्यांच्या मध्यें आहे.

(५.) दक्षिणेस कृष्णानामक नदी आहे, तिची उत्पत्ति महाबलेश्वराच्या डोंगरापासून आहे; तिचा प्रवाह आग्नेयी दिशेस जात आहे, आणि तिला वेण्या, कोयना, घटप्रभा, आणि मलप्रभा, ह्या नद्या मिळतात.

१२. महाराष्ट्र देश कसा आहे?

महाराष्ट्रदेशांतील हवा चांगली आहे; परंतु तेथें डोंगर फार म्हणून जमीन मध्यमप्रतीची, आणि जमिनीची लावणी व पीक हिंदुस्थानांतील इतर देशांपेक्षां कमी आहे.

१३. महाराष्ट्र देशांत मुख्यत्वें काय काय जिन्नस उत्पन्न होतात?

कापूस, साखर, रेशीम, आणि दुसरे हिंदुस्थानांतील मुख्य पदार्थ ह्या देशांत थोडे उत्पन्न होतात. येथील लोक ते पदार्थ आपल्या कामाकरितां मात्र उत्पन्न करितात. तरी गुजराथचा आणि नागपूर, बालेघाट, वगैरे

हिंदुस्थानचा कापूस, आणि माळव्याची अफू मुंबईस आणितात, आणि तेथून इंग्लंड देशास व चीन देशास पाठवितात. कोंकणांत पाऊस पुष्कळ ह्मणून तेथें भात फार पिकतें. देशांत बाजरी, ज्वारी, आणि गहूं ह्यांचें पीक फार होतें. तेथील लोक बहुतकरून तींच धान्यें खातात.

१४. महाराष्ट्रदेशांतील लोकांची चाल कशी आहे?

तेथील लोक हिंदुस्थानांतील समृद्ध देशाच्या लोकांपेक्षां बहुतकरून बळकट आहेत; ते लोक आपल्या प्रांतांत उत्पन्न कमी, ह्मणून दुसऱ्या प्रांतांत जाऊन लूट करीत असत.

१५. महाराष्ट्रदेशांत कोणकोणाचे अंमल चालतात?

त्याच्या पूर्व दिशेकडील एक विभाग मोंगलसरकारच्या स्वाधीन आहे, आणि दुसरा विभाग नागपूरचे राजाच्या *स्वाधीन आहे, तसाच दक्षिणेकडील एक लहानसा प्रदेश गोंव्याभोंवताला जो आहे, तो पोर्तुगाल देशचे लोक ह्यांच्या स्वाधीन आहे, आणि पश्चिमेकडील देश बहुतकरून इंग्रजसरकारच्या स्वाधीन आहे. त्यामध्येंच कोल्हापूरचा राजा, आणि दुसरे मांडलिक राजे, ह्यांचे देश आहेत. जो देश इंग्रजसरकारचे

* हा विभाग हल्लीं इंग्रजसरकारांस आला आहे.

स्वाधीन आहे, त्याचे त्यांनीं वेगळे वेगळे जिल्हे केले आहेत, त्यांचीं नांवें.

| जिल्हे. | हुजूर कचेरीचे गांव. |
|---|---|
| १. खानदेश जिल्हा, | धुळें. |
| २. अहंमदनगर जिल्हा, | अहंमदनगर. |
| ३. नासिक सबतुकडी, | नासिक. |
| ४. पुणें जिल्हा, | पुणें. |
| ५. सोलापूर सवतुकडी, | सोलापुर. |
| ६. कलादगी जिल्हा, | कलादगी. |
| ७. सातारा जिल्हा, | सातारा. |
| ८. बेळगांव जिल्हा, | बेळगांव. |
| ९. धारवाड जिल्हा, | धारवाड. |
| १०. उत्तरकोंकण जिल्हा, | ठाणें. |
| साष्टी आणि उरण ह्या नांवांचीं जीं दोन बेटें तीं ह्याच जिल्ह्यांत आहेत. | |
| ११. दक्षिण कोंकण जिल्हा, | रत्नागिरि. |
| १२. मुंबई बेट, | मुंबई शहर. |

१६. महाराष्ट्र देशामध्यें मोठमोठीं शहरें कोणतीं आहेत?

१. मुंबई शहर, हें पश्चिमहिंदुस्थानाची राजधानी आहे.

२. पुणें शहर, हें पूर्वी पेशवेसरकारची राजधानी होती.

३. सातारा, ही साताराच्या राजाची राजधानी होती.

४. कोल्हापूर, हें कोल्हापूरच्या राजाची राजधानी आहे.

५. अहंमदनगर, हें पूर्वी मुसलमान लोकांची एक राजधानी होतें.

६. अवरंगाबाद, हें पूर्वी दिल्लीचे बादशाहांच्या एके सुभ्यांतील मुख्य शहर होतें.

७. बऱ्हाणपूर, हें खानदेशची प्राचीन राजधानी होतें.

८. एलिचपूर, हें वऱ्हाड प्रांताच्या सरकारची प्राचीन राजधानी होतें.

९. नागपूर, हें भोंसले सरकारची राजधानी होतें.

१०. बेदर आणि कलबुरगें, हीं दोन शहरें प्राचीन मुसलमान राजांचीं मुख्य स्थानें होतीं.

११. विजापूर शहर, हें पूर्वी एका मुसलमान राजाची राजधानी होतें.

१२. गोवें, हें पोर्तुगाल देशच्या लोकांचें मुख्य शहर आहे, तेथील लोकांस मराठे लोक किरिस्तांव असें म्हणतात.

१७. महाराष्ट्र देशांत लहान लहान संस्थानें कोणतीं आहेत ?

१. सावंताची वाडी, सांवतनामक संस्थानिकाचें मुख्य गांव आहे.

२. जंजिरा बेट, हबशी सरकारचें मुख्य स्थान आहे.

३. अलिबाग, आंग्रे सरकारचें मुख्य गांव होतें.

४. तळेगांव, सेनापति दाभाडे ह्यांचें मुख्य गांव आहे.

५. भोर, पंतसचीव ह्यांचें मुख्य गांव आहे.

६. कऱ्हाड, पंतप्रतिनिधि ह्यांचें मुख्य गांव आहे.

७. मिरज शहर, महाराष्ट्र देशाचे दक्षिणेस आहे, तें पटवर्धन ह्यांचें मुख्य स्थान आहे.

८. टेंभुरणी, माणकेश्वराचें मुख्य गांव होतें.

९. सासवड, पुरंधरे ह्यांचें मुख्य गांव होतें.

१०. विंचुर, विंचुरकरांचें मुख्य गांव आहे.

११. निपाणी, निपाणकरांचें मुख्य गांव आहे.

१८. हिंदुलोकांचीं प्रसिद्ध स्थानें कोणतीं आहेत?

मुंबईजवळ घारापुरी म्हणून एक लहान बेट आहे, त्यांत भुयारामध्यें एक प्रसिद्ध कोरींव लेणें आहे. वेरूळ गांवाजवळ डोंगरांत कोरींव लेणीं फार चांगलीं पुष्कळ आहेत. परळी वैजनाथ, आंवढेनागनाथ, जोगाईचें आंबें, टोंकें, नासिक, त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, वांई, पंढरपूर, तुळजापूर, आणि जेजुरी, अशीं स्थानें हिंदु लोकांमध्यें प्रसिद्ध आहेत.

१९. महाराष्ट्र देशांतील मोठमोठाले किल्ले कोणते आहेत?

डोंगरी किल्ले सुमारें हजार आहेत; त्यांतील मोठमोठ्यांचीं नावें येणेंप्रमाणें आहेत.

अशीरीचा किल्ला, दौलताबादेचा किल्ला, शिवनेरी,

लोहगड, सिंहगड, पुरंधर, तोरणा, राजगड साताऱ्याचा किल्ला, रायगड, व प्रतापगड, हीं आहेत. मलंगगड, व करनाला हे दोन किल्ले मुंबईबेटाच्या समोर आहेत.

### भुईकोट किल्ले ह्यांचीं नांवें.

मुंबईचा किल्ला, ठाण्याचा किल्ला, चाकणचा किल्ला, अहंमदनगरचा किल्ला, मालेगांवचा किल्ला, करमाळ्याचा किल्ला, सोलापूरचा किल्ला, मिरजेचा किल्ला, अकलकोटचा किल्ला, बेळगांवचा किल्ला, आणि धारवाडचा किल्ला.

२०. सह्याद्रि पर्वतांतील प्रसिद्ध घाट कोणते आहेत?

एक तळें ह्या नांवाचा घाट नाशिकाकडे आहे; माळशिरसचा घाट जुनराजवळ आहे; बोरघाट खंडाळ्याजवळ आहे; पारघाट महाबळेश्वराजवळ आहे; आणि रामघाट दक्षिण महाराष्ट्र देशांत आहे.

२१. महाराष्ट्र देशाचा वसूल किती आहे, व तो कशापासून घेतात?

महाराष्ट्र देशांत इंग्रेज सरकारच्या अंमलाखालीं जो मुलूख आहे, त्याचा वसूल सरसालांत अजमासें एक कोटि रुपये आहे, तो वसूल बहुतकरून जमिनीच्या उत्पन्नापासून घेतात. त्या जमिनींपैकीं पांच षष्ठांश जमीन खालसा आहे, व एक षष्ठांश दुमाला आहे. सर्व महाराष्ट्र देशचा वसूल सरासरी सुमारें दीड कोटि रुपये आहे.

२२. जमिनीचा वसूल घेण्याचा व लोकांतील तंटे बखेडे मोडण्याचा बंदोबस्त सरकारानें कसा केला आहे ?

प्रत्येक जिल्ह्यास एकेक कलेक्तर सरकारानें नेमिला आहे, आणि त्यास वसूल घेण्याचा व फौजदारीचा अधिकार दिला आहे. त्या जिल्ह्याचे लहान लहान विभाग केले आहेत, त्या प्रत्येक विभागांत सरासरी शंभर शंभर गांव आहेत, त्यांस परगणे किंवा तालुके असें ह्मणतात. दर परगण्यास एकेक मामलेदार नेमिला आहे. जिल्ह्यामध्यें जसा कलेक्तराचा अंमल चालतो तसा परगण्यांत मामलेदाराचा अंमल चालतो. प्रत्येक गांवांत एकेक पाटील असतो, तो गांवच्या वसुलाचें आणि फौजदारीचें काम करितो. त्या त्या प्रकरणीं लिहिणें लिहावयास कुळकर्णी असतो. पाटील व कुळकरणी ह्यांचा अधिकार वंशपरंपरेनें चालतो. त्या कामाबद्दल त्यांस कांहीं जमीन इनाम दिलेली असते. ज्या गांवीं मोजणी होऊन जमिनीचा दर ठरला, त्या गांवीं त्या दरानेंच प्रतिवर्षी वसूल घेतात; आणि ज्या गांवची मोजणी होऊन दर ठरला नाहीं, त्या गांवीं पिकाच्या अजमासानें सरकारचे कामदार प्रतिवर्षी निरनिराळी जमाबंदी करितात. गांवांत रयतेचे दोन प्रकार असतात, उपरी आणि मिरासदार. मिरासदार कुळांकडे जमीन वंशपरंपरेनें असावी, असा नियम असतो.

उपरी कुळांविषयीं तो नियम नाहीं. ह्या देशांत शेतकरी लोकांचे पदरीं जमीन थोडी असते, आणि ते बहुतकरून गरीब असतात.

२३. दिवाणी आणि फौजदारी अंमल कसकसे चालविले आहेत?

दिवाणी आणि फौजदारी अंमल चालविण्याकरितां प्रत्येक जिल्ह्यास एकेक न्यायाधीश नेमिला आहे, त्यास जिल्हा जज्ज असें म्हणतात. आणि जिल्ह्यांतील मुख्य मुख्य गांवीं न्यायाचीं कोर्टे स्थापिलीं आहेत, व त्यांवर जे न्यायाधीश नेमितात त्यांस मुनसफ किंवा अमीन असें म्हणतात. त्यांच्या हद्दींत दोन तीन परगणे असतात; ते दिवाणीप्रकरणीं इनसाफ करितात. त्यांच्या फैसल्यावर अपील, ते ज्या जज्जाच्या ताब्यांत असतील त्या जज्जाकडे होतें. तसेंच जिल्ह्यांतील कलेक्तर ह्यांनीं फौजदारी प्रकरणीं फैसले केले असतील त्यांजवरही अपील जज्जाकडे होतें. जज्जाच्या फैसल्यावर अपील करणें झाल्यास तें मुंबई येथील हायकोर्टास करावें अशी व्यवस्था केली आहे.

## पहिल्या भागाचें शेष.

जे प्रसिद्ध गांव मागें सांगितले नाहींत त्यांचीं नांवें पुढें लिहिलीं आहेत.

## उत्तर कोंकण जिल्ह्यांतील.

१. दमान बंदर, हा गांव गोंव्याचे संस्थानाखालीं आहे.
२. तारापूर.
३. वसई. येथें एक प्राचीन ओसाड किल्ला आहे.
४. कल्याण.
५. भिवंडी.
६. पनवेल
७. बेलापूर.
८. चौक.

## दक्षिण कोंकण जिल्ह्यांतील.

१. नागोठणें.
२. बाणकोट.
३. महाड.
४. श्रीवर्धन, हें पेशव्यांचें मूळ गांव आहे.
५. दासगांव.
६. हर्णई.
७. चिपळूण.
८. परशुराम.
९. अंजनवेल.
१०. राजापूर.
११. विजयदुर्ग.
१२. वेंगुर्लें.

## अहंमदनगर जिल्ह्यांतील.

१. नासिक.
२. विंचूर.
३. येवलें.
४. संगमनेर.
५. जामगांव.
६. बेलें.
७. करमाळें.

## खानदेश जिल्ह्यांतील.

१. नंदुरबार.
२. थाळनेर.

३. जळगांव. ५. धरणगांव
४. मालेगांव. ६. एरंडोल.

पुणें जिल्ह्यांतील.

१. जुन्नर. ७. कारलें.
२. नारायणगांव ८. वडगांव.
३. खेड. ९. पाटस.
४. पावळ. १०. इंदापूर.
५. चिंचवड. ११. टेंभुर्णी.
६. खंडाळें. १२. पंढरपूर.

सोलापूर सबतुकडींतील.

१. ब्रह्मपुरी. ३. माढें.
२. मोहोळ. ४. बारशी.

बेळगांव जिल्ह्यांतील.

१. शाहापूर. ३. जमाखिंडी
२. मुधोळ.

धारवाड जिल्ह्यांतील.

१. हुबळी. २. नरगुंद.

कलादगी जिल्ह्यांतील.

१. बागलकोट. ३. विजापूर.
२. तालीकोट. ४. बदामी.

सातारा जिल्ह्यांतील.

१. वाई. २. शिरोळ.

३. कोरेगांव.
४. माहुली.
५. जावली.

## मोंगलाई राज्यांतील.

१. अजिंठा.
२. असई.
३. अंबर.
४. जालनापूर.
५. पुणतांबें.
६. पैठण.
७. उंबरावती.
८. नांदेड.
९. बीड.
१०. हिंगुली.

## कोल्हापूरच्या राज्याखालीं.

१. मलकापूर.
२. निपाणी.

---

# भाग दुसरा.

## महाराष्ट्र देशाच्या प्राचीन इतिहासाचें वर्णन.

१. महाराष्ट्र देशांत पूर्वीं प्रख्यात राजा कोणता झाला होता?

शालिवाहन ह्या नांवेंकरून प्रख्यात राजा झाला होता. त्याची राजधानी प्रतिष्ठान नामक शहर होतें; ज्यास हल्लीं पैठण ह्मणतात. तो राजा शककर्ता होता, आणि त्याचा शक इसवी सनानंतर ७८। सवा अठयाहत्तर वर्षांनीं चालू झाला, त्या शकास शालिवाहन शक असें ह्मणतात.

२. महाराष्ट्र देशाच्या प्राचीन इतिहासाविषयीं काय माहिती आहे?

इसवी सन १३०० तेराशें ह्यानंतर मुसलमान लोक नर्मदा नदीच्या दक्षिणेस स्वाऱ्या करूं लागले, तोंपर्यंत महाराष्ट्र देशाच्या प्राचीन इतिहासाविषयीं कांहींच माहित नाहीं.

३. नर्मदेच्या दक्षिणेस मुसलमान लोकांनीं प्रथम स्वारी केली, त्याविषयीं त्यांचें इतिहासकर्त्यांनीं काय वर्णन केलें आहे?

त्या स्वारींत त्यांनीं एका हिंदुराजाचा पराभव केला, त्या राजाची राजधानी देवगड म्हणून एक शहर होतें, त्यास आतां दवलताबाद असें म्हणतात. त्यानंतर दिल्लीचा पठाण राजा ह्याचे सैन्यानें सर्व दक्षिण देश जिंकून व लुटून फस्त केला.

४. त्या नंतर काय वर्त्तमान झालें?

दिल्ली सरकारचा जाफरखान ह्या नांवेंकरून एक कारभारी होता, त्यानें अजमासें इसवी सन १३५० तेराशें पन्नास ह्या वर्षीं दक्षिण देशांत एका मुसलमानी स्वतंत्र राज्याची स्थापना केली. तो जाफरखान मुसलमान पूर्वीं दिल्ली शहरांत एके ब्राह्मणाचे जवळ गुलाम होता, त्या ब्राह्मणानें त्यावर उपकार केला, त्या उपकारामुळें जाफरखानानें आपणास ब्राह्मण अशी संज्ञा घेतली; तो राजा मेल्यानंतर त्याच्या वंशांतील ज्या बादशाहांनीं राज्य केलें त्यांसही तेंच नांव पडलें, म्हणून त्या राज्यास इति-

हासामध्यें दक्षिणेंतील ब्राह्मणी राज्य असें वर्णिलें आहे.

५. तें राज्य किती दिवस चाललें होतें?

तें राज्य सुमारें १५० दीडशें वर्षेंपर्यंत चाललें होतें.

६. त्या राज्याची राजधानी कोणतें शहर होतें!

प्रथम कलबुरगें शहर त्याची राजधानी होतें, मग बेदर नामक शहर, त्या राज्याची राजधानी झालें.

७. ब्राह्मणी राज्याचा परिणाम काय झाला?

सुमारें इसवी सन १५०० पंधराशें ह्या वर्षी तें राज्य मोडून त्याचीं पांच वेगळीं वेगळीं राज्यें झालीं. त्यांतून तीन राज्यें पुढें बलिष्ठ झालीं; त्यांचीं नांवें गोंवळकोंडचें राज्य, विजापूरचें राज्य, आणि अहंमदनगरचें राज्य, अशीं होतीं.

८. ते राजे राज्य करीत असतां महाराष्ट्र देशांत एखादा मोठा दुष्काळ पडला होता कीं काय?

इसवी सन १३९६ ह्मणजे शके १३१८ ह्या वर्षी मोठा दुष्काळ पडला होता, तो बारा वर्षेंपर्यंत राहिला. यास दुर्गादेवीकृत असें ह्मणतात. त्या बारा वर्षांमध्यें महाराष्ट्र देशांत पाऊस अगदीं पडला नाहीं असें ह्मणतात.

९. त्या वेळच्या इतिहासामध्यें कोणत्या मराठी सरदाराचें नांव वर्णिलेलें आहे?

त्या वेळेस एक शिरके ह्मणून मोठा सरदार कोंकणांत होता, तो मुसलमान लोकांशीं युद्ध करून आपला संभाळ करण्याविषयीं समर्थ होता.

१०. ब्राह्मणी राज्य नष्ट होतेवेळेस हिंदुस्थानांत कोणती मोठी गोष्ट झाली ?

तें राज्य नष्ट होतेवेळेस पोर्तुगाल देशच्या लोकांचा जो वासको दि गामा ह्मणून एक सरदार होता, त्याबरोबर इसवी सन १४९७ ह्मणजे शके १४१९ ह्या वर्षी ते लोक कालिकोट बंदरांत प्रवेश करिते झाले. त्यानंतर इसवी सन १५१० ह्मणजे शके १४३२ ह्या वर्षी त्यांनीं गोंवें शहर आपले स्वाधीन करून घेतलें.

११. विजापूर, गोंवळकोंडें, आणि अहंमदनगर येथील राज्यांचीं उपनामें इतिहासामध्यें कशीं कशीं वर्णिलेलीं आहेत?

विजापूरचे राज्यास अदलशाही, व गोंवळकोंडचे राज्यास कुतुबशाहि आणि अहंमदनगरचे राज्यास निजामशाही, अशीं त्यांचीं उपनामें वर्णिलेलीं आहेत.

१२. ज्या काळीं महाराष्ट्र देशांत शिवाजी राजाचा उदय झाला त्या काळीं ह्या राज्यांची स्थिति कशी होती?

इसवी सन १६२८ ह्मणजे शके १५५० ह्या वर्षी अहंमदनगरचें राज्य आणि दिल्लीचें राज्य ह्या दोहों राज्यांच्या मध्यें कलह लागल्यामुळें अहंमदनगरचें राज्य नाशाप्रत पावलें. त्या वेळेस त्या राज्यामध्यें मलकंबर ह्मणून एक बुद्धिमान प्रधान होता त्यानें ह्या राज्याचें कांहीं काळपर्यंत संरक्षण केलें. त्याच प्रधानानें खडकी नामक शहराची स्थापना केली, अनंतर त्याच शहरास

अवरंगजेब बादशाह ह्यानें अवरंगाबाद असें नांव ठेविलें. त्या वेळेस गोंवळकोंडें व विजापूर हीं दोन्ही राज्यें उत्तरोत्तर दिल्लीचे राज्याच्या उत्कर्षामुळें न्यूनत्व पावतीं झालीं; परंतु तीं दोन्ही राज्यें अवरंगजेब बादशाहा ह्यानें इसवी सन १६८७ ह्मणजे शके १६०९ ह्या वर्षीं अगदीं नाहींशीं केलीं. त्यापूर्वी तीं दोन राज्यें २०० दोनशें वर्षेंपर्यंत स्वतंत्र होतीं.

---

# भाग तिसरा.

ह्या भागांत दोन प्रकरणें आहेत, त्यांतून पहिलें प्रकरण शिवाजी व दुसरे राजे ह्यांविषयीं; आणि दुसरें प्रकरण पेशव्यांविषयीं, अशीं वर्णिलेलीं आहेत.

## प्रकरण पहिलें.

### राजांचें वर्णन.

शिवाजी राजा ह्याविषयीं. इसवी सन १६२७ ह्मणजे शके १५४९ ह्या वर्षापासून इसवी सन १६८० ह्मणजे शके १६०२ ह्या वर्षापर्यंत झालेलीं वर्तमानें.

१. मराठी राज्याची स्थापना कोणी केली?

मराठी राज्याची स्थापना शिवाजी राजा ह्यानें केली.

२. तो कधीं जन्मला, आणि कधीं मृत्यु पावला?

तो इसवी सन १६२७ ह्मणजे शके १५४९ ह्या

वर्षीं जन्मला, आणि इसवी सन १६८० ह्मणजे शके १६०२ ह्या वर्षीं मृत्यु पावला.

३. त्याच्या पूर्वजांचें वर्णन कसें कसें केलें आहे?

त्याच्या पूर्वजांचें उपनांव भोंसले असें होतें, आणि दौलताबादेजवळ वेरूळ ह्मणून एक गांव आहे, तेथें ते रहात असत. त्याच्या सर्व पूर्वजांमध्यें मालोजी भोंसला ह्मणून शिवाजीचा आजा होता, त्यास प्रथम मोठी पदवी प्राप्त झाली. त्यानें आपला पुत्र जो शहाजी, त्यास महाराष्ट्र देशांत* शिंदकेरचा जाधवराव ह्मणून एक बळिष्ठ सरदार होता, त्याची कन्या केली. त्या जाधवरावाजवळ निजामशाही सरकारचा दहा हजार स्वारांचा सरंजाम होता, आणि त्या सरकारापासून मालोजीस पुणें व सुपें ह्या दोहों प्रांतांची जाहागीर प्राप्त झाली. आणि शिवनेरी व चाकण ह्या दोन्हीं किल्ल्यांचें व त्यांजखालीं जो मुलूख होता त्याचेंही काम त्याजकडेसच झालें.

४. शहाजीचें वर्णन कसें केलें आहे?

अहंमदनगरचें राज्य नाशामत पावण्याचे वेळेस शहाजी मोंगलाकडे गेला, तेव्हां शहाजहान ह्मणून दिल्लीचा बादशाह होता, त्यानें शहाजीकडे जें जें होतें

---

*शिंदकेर ह्मणून अवरंगाबादेचे पश्चिमेस तीस कोसांवर एक गांव आहे.

तें तें त्याचेंच असें स्थापित केलें. त्यानंतर त्या शहाजीस दिल्लीचे सरकारनें जीं इनामें करून दिलीं होतीं त्यांतून कांहीं माघारीं घेतल्यामुळें तो अत्यंत खिन्न झाला; आणि तें सरकार सोडून अहंमद अदिलशाहा जो विजापूरचा बादशाह ह्याचा आश्रय करून मरणकाळपर्यंत त्याच्या चाकरीस राहिला. शहाजीस पुणें आणि सुपें हे दोन प्रांत पूर्वीं मिळाले होते, तेच त्याचे राहिले असें नाहीं, तर पुढें आणखी करनाटकांत मोठमोठे मुलूख त्यानें मिळविले.

५. शिवाजी कोठें जन्मला ?

शिवाजी जुन्नराजवळ जो शिवनेरी किल्ला आहे त्यांत जन्मला.

६. शिवाजी राजा लहानपणीं कोठें होता आणि कोणाच्या शिक्षेंत होता ?

ज्या काळीं त्याचा बाप शहाजी करनाटकांत होता, त्या काळीं तो लहानपणीं पुणें प्रांतांत दादोजी कोंडदेव ह्मणून एक ब्राह्मण जो शहाजीचा कारभारी, त्याच्या शिक्षेंत होता. तो एकुणीस वर्षांचा झाला नाहीं तोंच त्यानें तोरणा किल्ला आपले हस्तगत करून घेतला. ह्यावरून असें दिसतें कीं, तो लहानपणापासूनच आपली सत्ता चालविण्याविषयीं प्रयत्न करीत होता. दादोजी कोंडदेव मरण पावल्यानंतर त्या प्रांताचें काम स्वतः चालवून तेथील वसूलही आपण घेऊं लागला. त्या-

नंतर त्यानें विजापूरच्या अमलांतील पुरंधर आणि दुसरे किल्ले युक्तीयुक्तीनें घेतले.

७. त्यानें आपली सत्ता कोणत्या प्रकारानें वाढविली?

त्यानें आपली सत्ता बहुतकरून दिल्लीचे आणि विजापूरचे मुलकांत लूट करून वाढविली; आणि त्या लुटीच्या द्रव्यानें त्याला मोठी फौज ठेवण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें.

८. त्याचें पायदळ कोणत्या प्रकारचें होतें?

त्याचें पायदळ मावळ ह्मणून घाटमाथ्याच्या प्रांतांतील रानटी शूर लोकांचें होतें.

९. त्यानें विजापूरच्या राज्यांतला कोणता सुभा घ्यावयाकरितां प्रथम प्रयत्न केला?

त्यानें प्रथम इसवी सन १६४८ ह्मणजे शके १५७० ह्या वर्षी कल्याणचा सुभा घ्यावयाचा प्रयत्न करून तो बेत सिद्धीस नेला.

१०. जेव्हां तो वृद्धिंगत होऊं लागला, तेव्हां विजापूरचे बादशाहानें त्याचा पराभव करण्याकरितां कोणता प्रयत्न केला?

इसवी सन १६५९ ह्मणजे शके १५८१ ह्या वर्षी विजापूरच्या बादशाहानें आपल्या अफजूलखान नामक सरदाराबरोबर मोठी फौज देऊन शिवाजीशीं युद्ध करावयाकरितां त्यास पाठविलें.

११ त्या युद्धाचा परिणाम काय झाला?

शिवाजीनें त्या सरदाराजवळ एकांतीं खलबत करण्याचा वाट घालून त्यास आपण कपटानें ठार मारिलें.

१२. शिवाजीनें आपल्या नांवास राजा हें पद कधीं जोडिलें; आणि आपल्या नांवाचें नाणें पाडावयाकरितां कोणत्या वर्षीं टांकसाळ घातली?

इसवी सन १६६४ ह्मणजे शके १५८६ ह्या वर्षीं त्याचा बाप मृत्यु पावला, त्याच वर्षीं त्यानें आपणाला राजा असें म्हणविलें, आणि त्या वेळेसच आपल्या नांवाची एक टांकसाळ घातली.

१३. शिवाजीनें कोणत्या ब्राह्मणास प्रथम पेशवाईचा अधिकार दिला?

इसवी सन १६५६ म्हणजे शके १५७८ ह्या वर्षीं शामराजपंत म्हणून एक ब्राह्मण होता, त्यास शिवाजीनें तो अधिकार दिला.

१४. त्याचें नेहमींचें राहावयाचें स्थान कोणतें होतें आणि गादीची जागा कोणती होती?

त्याचें नेहमीं राहावयाचें स्थान व गादीची जागा पहिल्यानें राजगड किल्ला होता; त्यानंतर रायगड किल्ला झाला.

१५. त्यानें कोणते कोणते डोंगरी किल्ले बांधिले?

त्यानें डोंगरी किल्ले पुष्कळ बांधिले, त्यांत राजगड आणि प्रतापगड हे दोन किल्ले मुख्य होते.

१६. त्याची शक्ति वृद्धिंगत होत चालली असतां मध्यें काय विघ्न झालें?

त्याचा पराभव करावयास विजापूरचें सरकार समर्थ नव्हतें, परंतु तो दिल्लीचे बादषाहाचे मुलखांत स्वाऱ्या करीत असे; म्हणून, अवरंगजेब बादषाहानें जयवंतशिंग नामक आपल्या शूर सरदाराबरोबर कांहीं फौज देऊन त्याला शिवाजीवर पाठविलें, हेंच त्याची शक्ति वृद्धिंगत होत असतां मध्यें विघ्न झालें.

१७. त्यानें शिवाजीस जिंकण्याकरितां आपली फौज पाठविली, ह्यावरून काय झालें?

शिवाजी, बादषाहास शरण जाऊन त्याचे चाकरीस राहीन असें त्या सरदारापाशीं कबूल करून इसवी सन १६६६ म्हणजे शके १५८८ ह्या वर्षी बादषाहास भेटावयाकारितां दिल्लीस गेला; परंतु तेथें बादषाहानें त्याच्या इच्छेप्रमाणें त्याचा सन्मान केला नाहीं, म्हणून शिवाजी त्याला कांहीं टाकून बोलला. त्यामुळें बादषाह आपणास येथें कैद करून ठेवील, असें भय प्राप्त होऊन तो तेथून गुप्तरूपें निघून दक्षिण देशांत माघारा आला. त्यानंतर कांहीं दिवसांनीं बादषाहापासून शिवाजीस राजा असा किताब प्राप्त झाला.

१८. हिंदुस्थानामध्यें मराठे लोकांत चौथाई आणि सरदेशमुखी हे दोन हक्क मूळ प्रारंभीं कोणत्या प्रकारानें उत्पन्न झाले?

ज्या वेळेस शिवाजी अवरंगजेबास शरण गेला, त्या वेळेस त्या अवरंगजेबाची आणि विजापूरकराची लढाई चालली होती, तेव्हां शिवाजीनें अवरंगजेबाचा हुकूम घेऊन विजापूरकरापासून त्याचे मुलखांतील दोन तीन प्रांतांची चौथाई व सरदेशमुखी हे दोन हक्क घेण्याचा ठराव केला. त्यानंतर हे दोन हक्क जिकडे जिकडे जसा जसा प्रसंग आला, तिकडे तिकडे तसे चालविले. इसवी सन १६७० ह्मणजे शके १५९२ ह्या वर्षी हे चौथाईचे आणि सरदेशमुखीचे हक्क दिल्लीचा सुभा जो खानदेश त्यांतही त्यानें बसविले.

१९. त्यानें शूरत्वाचीं जीं कृत्यें केलीं, त्यांमध्यें जीं जीं प्रसिद्ध आहेत त्यांतून कितीएकांचें वर्णन कर.

इसवी सन १६६५ ह्मणजे शके १५८७ ह्या वर्षी त्यानें जळमार्गानें जाऊन मलबार प्रांतांत स्वारी केली, त्यानें सुरत शहर दोन वेळ लुटिलें. त्यामध्यें दुसरे वेळेस त्यानें आपल्या बरोबर पंधरा हजार फौज नेली होती, त्या काळीं हुबली नामक शहर संपत्तियुक्त होतें, तें त्यानें लुटिलें, आणि त्यांत जशी लूट मिळाली तशी त्याला पूर्वी कधींच मिळाली नव्हती. ज्या वेळेस त्यानें आपला भाऊ व्यंकोजी ह्याजपासून आपल्या बापाच्या जाहगिरीचा विभाग घेण्याकरितां व विजापूर सरकारचा मुलूख लुटण्याकरितां करनाटकांत शेवटची स्वारी केली, त्या वेळेस त्यानें आपल्या बरोबर चाळीस हजार पायदळ

व तीस हजार स्वार अशी फौज नेऊन आपले दोन्ही मनोरथ सिद्धीस नेले.

२०. त्याच्या राज्याची स्थापना करण्याचे कामांत मुख्य कारभारी कोणकोणते होते?

त्याच्या राज्याची स्थापना करण्याचे कामांत मुख्य कारभारी शामराजपंत ह्मणून होता. पेशवाईचे कामावर तो प्रथम नेमिला होता, त्याजकडून तें काम कांहीं कारणामुळें काढून मोरोपंत पिंगळा ह्मणून एक शूर सरदार होता त्याजकडे त्यानें सांगितलें; त्यानें तें काम फार दिवस चालविलें. शिवाजीचे लहानपणचे मित्र येसाजी कंक, तान्हाजी मालुसरे, व बाजी फसलकर हे होते. त्यांनीं त्याजकरितां कांहीं मोठया लढाया करून जय मिळविला. प्रतापराव गुजर हा त्याच्या घोडेस्वारांचा मुख्य अधिकारी होता. प्रतापराव मरण पावल्यानंतर हंबीरराव मोहिता सेनापति झाला. जे प्रांत त्यानें जिंकून घेतले होते, त्यांचें वसुलाचें काम शिवाजीनें आबाजी सोनदेव ह्यास सांगितलें.

२१. शिवाजीस राज्याभिषेक कधीं झाला?

इसवी सन १६७४ ह्मणजे शके १५९६ ह्या वर्षी रायगडावर शिवाजीस यथाविधि राज्याभिषेक झाला.

२२. त्याच्या प्रधानांचे किताब कसे कसे होते?

त्याजवळ आठ प्रधान होते, म्हणून त्यांस अष्ट प्रधान अशी संज्ञा होती; त्यांचीं नांवें.

| | |
|---|---|
| १. पेशवा अथवा मुख्य प्रधान. | ५. सेनापति. |
| २. पंत अमात्य. | ६. सुमंत. |
| ३. सचीव. | ७. न्यायाधीश. |
| ४. मंत्री. | ८. पंडितराव. |

२३. त्या अष्टप्रधानांचीं वेगळीं वेगळीं कामें कोणतीं होतीं?

| | | |
|---|---|---|
| १. | पेशवा, मुख्य प्रधान. | ह्याजकडे मुख्य दिवाणगिरीचें काम. |
| २. | पंत अमात्य. | ह्याजकडे जमाबंदीचें व खर्चाच्या चौकशीचें काम. |
| ३. | पंत सचीव. | ह्याजकडे दप्तरदारीचें व बारनिशीचें काम. |
| ४. | मंत्री. | ह्याजकडे खासगी शिबंदीचें व वाकनिशीचें काम. |
| ५. | सेनापति. | ह्याजकडे संपूर्ण फौजेचें काम. |
| ६. | सुमंत. | ह्याजकडे परराज्यसंबंधी, काम व त्यांजकडील वकिलांशीं बोलण्याचें काम. |
| ७. | न्यायाधीश. | ह्याजकडे न्याय करण्याचें काम. |
| ८. | पंडितराव. | ह्याजकडे शास्त्रार्थ सांगण्याचें काम. |

२४. वर्त्तमान काळच्या बडेलोकांतील त्या वेळेस कोणकोणते लोक उत्कर्ष पावले होते?

आबाजी सोनदेव ह्याच्या वंशांतील पुरुष साताराचे राज्याच्या शेवटापर्यंत पंत अमात्याचे कामावर होता, आणि हंबीरराव मोहिते ह्याच्या वंशांतील पुरुष साताराचे राज्याच्या अखेरीपर्यंत तेथील स्वारांचा मुख्य अधिकारी होता; शिरके ह्मणून जो सरदार, ज्याचें वर्णन पूर्वी दुसरे भागांत केलें आहे, त्याचा वंश आतां कोंकणांत आहे; पण ते सांप्रतकाळीं फारसे प्रतिष्ठित नाहींत. मुधोळकर घोरपडे जे विजापूर सरकारचे चाकरीस होते त्यांच्या सरंजामास जो मुलूख पूर्वी चालत होता, तो अद्यापि त्यांच्या वंशाकडे तसाच चालत आहे.

२५. शिवाजी राजा कधीं मृत्यु पावला? आणि त्यास किती पुत्र होते.

इसवी सन १६८० ह्मणजे शके १६०२ या वर्षी शिवाजी राजा मृत्यु पावला, त्या वेळेस त्याचें वय त्रेपन्न वर्षांचें होतें, आणि त्यास दोन पुत्र होते, त्यांत वडील पुत्राचें नांव संभाजी, आणि धाकट्या पुत्राचें नांव राजाराम असें होतें.

२६. त्याच्या अंतकाळीं कोणकोणते प्रांत त्याचे स्वाधीन होते?

ज्या समयीं तो मृत्यु पावला त्या समयीं सर्व कोंकण व पुणें प्रांत व करनाटकांतले आणि दुसरेकडील कांहीं देश त्याचे स्वाधीन होते. त्याच्या प्रांतामध्यें पुष्कळ

डोंगरी किल्ले होते. त्या किल्ल्यांवर त्यानें शिबंदी लोक ठेवून आपल्या मुलखाचा बंदोबस्त राखिला होता.

## संभाजी राजाचें वर्णन.

इसवी सन १६८० म्हणजे शके १६०२ ह्या वर्षापासून इसवी सन १६८९ म्हणजे शके १६११ ह्या वर्षापर्यंत झालेलीं वर्तमानें.

१. शिवाजी राजा मरण पावल्यानंतर त्याचे गादीवर कोण बसला?

शिवाजी मरण पावल्यानंतर त्याचा वडील पुत्र जो संभाजी तो त्याचे गादीवर बसला. त्या वेळेस त्याचें वय तेवीस वर्षांचें होतें.

२. तो कोणत्या प्रकारचा मनुष्य होता?

तो थोडासा आपल्या बापासारखा शूरच होता, परंतु स्वभावानें फार क्रूर आणि दुर्व्यसनी होता. कितीएक लोकांनीं त्याचा धाकटा भाऊ राजाराम ह्यास गादीवर बसविण्याविषयीं प्रयत्न केला होता; त्या लोकांस व राजारामाचे आईस त्यानें ठार मारिलें.

३. त्यानें राज्य कसें चालविलें?

त्यानें आपल्या बापाचें वेळचे जे शाहाणे प्रधान होते त्यांचा धिक्कार करून एक कलुशा नामक कनोजा ब्राह्मण होता, त्याजकडे सर्व राज्याचा कारभार सांगितला.

४. त्याच्या वाईट वर्तणुकेमुळें त्याचा कोणता वाईट परिणाम झाला?

त्याच्या वाईट वर्त्तणुकेमुळें त्याच्या बापाच्या वेळचा बंदोबस्त होता तो अगदींच बिघडला, आणि कोणे एके वेळेस तो निर्भयपणानें संगमेश्वराजवळ शिकारीस गेला होता, त्या वेळस तेथें त्याला मोंगलांनीं अकस्मात् धरून कैद केलें.

५. मग काय झालें?

त्या वेळेस अवरंगजेब बादशाह दक्षिण देश घ्यावयाकरितां दिल्लीहून मोठी फौज घेऊन ह्या देशांत आला होता. त्यानें संभाजी व कलुशा ब्राह्मण ह्या दोघांस क्रूरत्वानें हाल करून तुळापूर येथें ठार मारिलें.

६. तो कोणत्या वर्षी मारिला गेला?

तो इसवी सन १६८९ म्हणजे शके १६११ ह्या वर्षी मारिला गेला, त्यानें नऊ वर्षेपर्यंत राज्यकारभार चालविला होता.

---

## राज्याधिकारी राजाराम आणि ताराबाई ह्यांचें वर्णन.

इसवी सन १६८९ म्हणजे शके १६११ ह्या वर्षापासून इसवी सन १७०८ म्हणजे शके १६३० ह्या वर्षापर्यंत झालेलीं वर्त्तमानें.

१. संभाजी मरण पावल्यानंतर काय झालें?

संभाजी मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र जो शिवाजी. त्यासच शाहुराजा असें नांव पुढें प्राप्त झालें. त्यास

मोंगलांनीं कैद करून ठेविलें होतें, ह्मणून कितीएक मराठे सरदारांनीं असें ठरविलें कीं, संभाजीचा सावत्र बंधु जो राजाराम ह्याच्या हातून सांप्रत राज्यकारभार चालवावा.

२. त्यानें किती वर्षें राज्यकारभार चालविला?

त्यानें अकरा वर्षेंपर्यंत राज्यकारभार चालविला; आणि इसवी सन १७०० ह्मणजे शके १६२२ ह्या वर्षी तो मृत्यु पावला.

३. जेव्हां तो राज्य चालवीत होता तेव्हां कोणत्या कोणत्या प्रख्यात गोष्टी झाल्या?

तो राज्य चालवीत असतां त्यानें सातारा येथें आपली गादी स्थापिली, आणि प्रल्हाद निराजी ह्मणून एक ब्राह्मण होता त्यानें सरकारचीं फार मोठीं मोठीं कामें केलीं होतीं ह्मणून त्याजकरितां राजानें एक नूतन पदवी योजून त्याला पंतप्रतिनिधि असा किताब देऊन तो सर्व प्रधानांपेक्षां मोठा केला. संताजी घोरपडे सेनापति ह्याचा सन्मान करण्याकरितां एक नवें* निशाण करून त्याचे स्वाधीन केलें. त्या निशाणाचें नांव जरीपटका असें ठेविलें.

४. तो राज्यकारभार चालवीत होता तेव्हां कोणकोणते सरदार प्रख्यात होते?

*मराठे लोकांचें निशाण पिंवळ्या फडक्याचें होतें, त्यास भगवा झेंडा ह्मणत.

तो राज्यकारभार चालवीत होता तेव्हां धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे, व दुसरे कितीएक सरदार प्रख्यात होते. त्या सरदारांच्या योगानेंच संभाजीचे कारकिर्दीत जो राज्याचा बखेडा झाला होता, त्याचा पुनः यथास्थित बंदोबस्त होऊन मराठे लोकांचा उत्कर्ष झाला.

५. राजाराम मरण पावल्यानंतर काय झालें?

राजाराम मरण पावल्यानंतर त्याची वडील बायको ताराबाई हिनें आपला पुत्र शिवाजी ह्यास गादीवर बसवून त्याच्या नांवानें राज्य चालविलें. त्या वेळेस त्या शिवाजीचें वय दाहा वर्षांचें होतें.

६. हे राजे राज्य चालवीत असतां मराठी राज्य बुडविण्याविषयीं कोण प्रयत्न करीत होता?

हे राजे राज्य चालवीत असतां अवरंगजेब मराठी राज्य बुडविण्याकरितां दक्षिण देशांत मोठी फौज घेऊन लढाई करीत होता; परंतु त्याचा उद्योग सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं इसवीं सन १७०७ ह्मणजे शके १६२९ ह्या वर्षी तो मृत्यु पावला.

## शाहुराजाचें वर्णन.

इसवी सन १७०८ ह्मणजे शके १६३० ह्या वर्षांपासून इसवी सन १७४९ ह्मणजे शके १६७१ ह्या वर्षापर्यंत झालेलीं वर्तमानें.

१. अवरंगजेब बादशाह मरण पावल्यानंतर काय झालें?

अवरंगजेब बादशाह, मरण पावल्या नंतर शिवाजी ह्मणून जो संभाजीचा पुत्र तो कैदेंतून सुटला. नंतर कितीएक मराठे सरदार त्यास सहाय होऊन त्यांनीं त्याला साताऱ्यास नेऊन तेथें इसवी सन १७०८ ह्म० शके १६३० ह्या वर्षी गादीवर बसविलें. त्या वेळेस त्याचें वय चोवीस वर्षांचें होतें. पुढें ताराबाई आणि तिचा पुत्र "शिवाजी ह्यांनीं कांहीं काळपर्यंत राज्याच्या प्राप्तीविषयीं उद्योग केला; परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. मग तीं दोघें तेथून निघून कोल्हापुरास गेलीं, आणि तेथें त्यांनीं कांहीं संस्थान आपण वळकावून एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली.

२. ह्या राजाचें नांव शिवाजी असतां शाहुराजा असें कशावरून पडलें?

ज्या वेळीं हा राजा अवरंगजेबापाशीं कैदेंत होता, त्यावेळीं ह्याचा आजा जो शिवाजी राजा त्यानें देश कसकसे लुटिले होते ह्याचें स्मरण अवरंगजेबास झालें ह्मणजे त्याला शिवाजी लुटारू आणि ह्याला शिवाजी साव असें तो विनोदानें म्हणत असे, ह्यावरून शाहू असें नांव पडलें.

३. जेव्हां शाहुराजा १७ वर्षे पर्यंत कैदेंत होता, त्यावेळेस अवरंगजेबाच्या घरचीं माणसें त्याशीं कोणत्या प्रकारानें वागत होतीं?

शाहुराजा कैदेंत असतां अवरंगजेबाची कन्या त्याजवर व त्याच्या आईवर फार प्रीति करीत असे. अवरंगजेबानेंही त्याला सोडून द्यावें असा आपल्या मनांत विचार करून आपल्या पदराच्या दोघां मोठया मराठे सरदारांच्या कन्या पाहून त्याचें लग्न केलें. आणि त्याला कांहीं प्रांतांची जाहगीरही करून दिली.

४. मराठे सरदार ज्यांस अक्कलकोटचे राजे असें ह्मणतात त्यांचा मूळपुरुष कोण होता?

ज्या वेळेस शाहुराजा कैदेंतून सुटून मराठी राज्यांतून चालला, त्यावेळेस जे गांव ताराबाईकडेस होते, त्यांतील लोकांनीं शाहुराजाचे मनुष्यांवर हल्ला केला, त्या दंग्यामध्यें कोणी एके स्त्रीनें आपला मूल शाहुराजाचे पायांवर टाकिला त्या मुलास शाहुराजानें आपल्या जवळ ठेवून त्याचा प्रतिपाळ केला. तोच मुलगा पुढें अक्कलकोटचा राजा झाला.

५. शाहुराजाच्या गुणांचें वर्णन कसकसें केलें आहे?

शाहुराजा चैनी होता. तो सर्व राज्याचें काम आपल्या प्रधानाकडे सांगून आपण आपल्या इच्छेस येईल तसा वर्त्तत असे.

६. प्रारंभीं जेव्हां शाहुराजा राज्य करूं लागला, तेव्हां मराठी राज्याची स्थिति कशी होती, आणि त्यानंतर कोणता पुरुष मुख्य प्रधान झाला?

त्यावेळेस मराठी राज्यांत फार अव्यवस्था होती,

आणि वसूल घेण्याविषयींही कांहीं नेम नव्हता. सेनापति धनाजी जाधव ह्यांजकडे वसुलाचें काम होतें. त्यानें तें काम करण्याकरितां दोन कारकून ठेविले होते, त्यांतील एक आबाजी पुरंधरे आणि दुसरा बाळाजी विश्वनाथ; हे दोघे मराठी इतिहासाचे वर्णनामध्यें प्रख्यात आहेत. त्या दोघांतून बाळाजी विश्वनाथ ह्यानें तर पेशवाई आपल्या वंशास करून घेतली. शाहुराजा राज्य करूं लागल्यावर धनाजी जाधव लवकरच मृत्यु पावला. त्यानंतर बाळाजी विश्वनाथ हा राज्याचा मुख्य संमत देणारा झाला.

७. त्याला पेशवाईचा अधिकार कधीं प्राप्त झाला?

इसवी सन १७१४ म्हणजे शके १६३६ ह्या वर्षी मोरोपंत पिंगळे ह्यांच्या वंशांतील जो बहिरोपंत तो पेशवाईचें काम चालवीत होता; त्याजकडून तें काम काढून राजानें बाळाजी विश्वनाथ ह्याजकडे सांगितलें. त्याच वेळेस आबाजी पुरंधरे हा पेशव्यांचा मुतालिक झाला.

८. त्यानें पेशवाईचा अधिकार कसा चालविला?

ज्या दिवसापासून तो पेशवाईचा अधिकार चालवूं लागला, त्या दिवसापासून मराठे लोकांची सत्ता अधिकाधिक वाढत चालली.

९. शाहुराजानें किती वर्षैपर्यंत राज्य केलें?

शाहुराजानें कैदेंतून सुटल्यानंतर ४२ वर्षैपर्यंत राज्य केलें.

१०. तो कधीं मृत्यु पावला?

इसवी सन १७४९ म्हणजे शके १६७१ ह्या वर्षी तो मृत्यु पावला. त्यावेळेस त्याचें वय ६६ वर्षांचें होतें. त्यास संतान नव्हतें. त्याच्या राज्याचें वर्णन पेशव्यांच्या इतिहासामध्यें, म्हणजे ह्या भागाचे दुसऱ्या प्रकरणांत केलें आहे.

११. त्यानें आपण मरण पावल्याचे पूर्वी पेशव्यांस कसकसा अधिकार करून दिला?

त्यानें आपल्या अंतकाळाच्या समयीं पेशवे ह्यांस एक सनद करून दिली, तींत असें लिहिलें होतें कीं, तुम्हीं शिवाजी राजाच्या वंशाचा सन्मान राखावा; आणि ताराबाईचा नातू जो रामराजा हा दत्तक देऊन माझ्या पाठीमागें गादीवर बसवून आपण संपूर्ण राज्याचा अधिकार चालवावा.

---

## रामराजा, व दुसरा शाहुराजा, व प्रतापसिंह राजा ह्यांचें वर्णन.

इसवी सन १७४९ म्हणजे शके १६७१ ह्या वर्षापासून इसवी सन १८१८ म्हणजे शके १७४० पर्यंत.

१. शाहुराजा मरण पावल्यानंतर काय झालें?

शाहुराजा मरण पावल्यानंतर रामराजाला नांवाचामात्र राजा करून गादीवर बसविलें होतें. तो तसाच

परतंत्र राहून इसवी सन १७७७ ह्मणजे शके १६९९ ह्यावर्षीं मृत्यु पावली. त्याच्या राज्याच्या वेळेस पेशवे ह्यांनीं संपूर्ण राज्याचा अधिकार चालविला.

२. रामराजा मरण पावल्यानंतर कोण राजा झाला?

रामराजा निपुत्रिक होता, ह्मणून शिवाजी राजाच्या पणजाच्या वंशांतील कोणीएक पुरुष दत्तक घेऊन गादीवर बसविला. आणि शाहुमहाराज असें त्याचें नांव ठेविलें, तोही परतंत्र होता.

३. तो मृत्यु पावल्यावर काय झालें?

इसवी सन १८०८ ह्मणजे शके १७३० ह्यावर्षीं तो मरण पावल्यानंतर, त्याचा पुत्र प्रतापसिंह नामक गादीवर बसला; आणि इसवी सन १८१८ म्हणजे शके १७४० ह्यावर्षी इंग्रेज लोकांनीं पेशव्यांचें राज्य घेऊन शिवाजीच्या राज्यांतील कांहीं संस्थान ह्याजकडे दिलें. तोंपर्यंत तोही साताऱ्याच्या किल्ल्यावर पेशव्यांनीं कैदेंत ठेविला होता.

इसवी सन १८३९ म्हणजे शके १७६१ ह्या वर्षीं प्रतापसिंह राजा ह्याजवर फितुराचा दोष आल्यामुळें त्यास इंग्रेज सरकारानें राज्यावरून काढून त्याचा धाकटा भाऊ शाहाजी हा साताऱचा राजा केला होता. तो इसवी सन १८४८ म्हणजे शके १७६९ ह्या वर्षीं मृत्यु पावला. ह्या राजाचा निर्वंश झाला. व ह्याच्या वंशांत दुसरा कोणी राज्याचा अधिकारी नव्हता,

म्हणून तें राज्य इंग्रेज सरकारानें आपले स्वाधीन करून घेतलें.

## प्रकरण दुसरें.

### पेशव्यांचें वर्णन.

१. बाळाजी विश्वनाथ ह्याचें वर्णन. इसवी सन १७१४ ह्मणजे शके १६३६ ह्या वर्षापासून इसवी सन १७२० म्हणजे शके १६४२ ह्या वर्षापर्यंत.

१ बाळाजी विश्वनाथ ह्यानें पेशवाईचें काम किती दिवस केलें?

बाळाजी विश्वनाथ सहा वर्षेपर्यंत पेशवाईचें काम करून इसवी सन १७२० म्हणजे शके १६४२ ह्या वर्षी मृत्यु पावला.

२. तो पेशवाईचा अधिकार चालवीत असतां त्यानें मराठी राज्याची वृद्धि कोणत्या प्रकारानें केली?

तो पेशवाईचा अधिकार चालवीत असतां दिल्लीचा बादशाह अगदींच परतंत्र झाला. त्या राज्यांत सय्यद म्हणून दोघे बंधु मुसलमान सरदार होते. ते बादशाहाच्या वंशांतील जो त्यांच्या मनास येई त्याला तक्तावर बसवून आपण संपूर्ण राज्याचा अधिकार चालवीत होते. बाळाजी विश्वनाथ ह्यानें आपलें सैन्य त्यांच्या सैन्याशीं मिळविलें, आणि त्यांजबरोबर दिल्लीस जाऊन त्यांचे आश्रयानें बादशाहापासून शाहराजा-

करितां दक्षिण देशांतील * स्वराज्य व चौथाई, व सरदेशमुखी, हीं तिन्ही संपादिलीं.

३. बाळाजी विश्वनाथ कोणत्या स्थळीं मृत्यु पावला?

तो सासवड ह्मणून जें गांव तेथें मृत्यु पावला.

४. बाळाजी विश्वनाथ ह्याचे अंतकाळाच्या समयीं दक्षिण देशांत स्वतंत्र राज्याची स्थापना करण्याविषयीं कोण प्रयत्न करीत होता?

ज्या वर्षीं बाळाजी विश्वनाथ मृत्यु पावला त्याच वर्षीं निजामउल्मुलुख हा नर्मदेच्या अलीकडे येऊन त्या दोघां सय्यद बंधूंशीं लढाई करूं लागला. हा निजामउल्मुलुख सांप्रतच्या हैदराबाद सरकारच्या वंशाचा मूळ पुरुष होता. तो आणि त्याचे पाठीमागून जे पुरुष हैदराबादचे गादीवर बसले त्यांस इंग्रेज लोक निजाम आणि मराठेलोक नबाब, असें ह्मणतात.

५. बाळाजी विश्वनाथ ह्यास किती पुत्र होते?

त्यास दोन पुत्र होते. त्याच्या वडील पुत्राचें नांव बाजीराव, आणि धाकट्या पुत्राचें नांव चिमणाजी आपा, असें होतें. तो मरण पावल्यानंतर शाहुराजानें त्याचा वडील पुत्र जो बाजीराव ह्यास पेशवाईचा अधिकार दिला.

---

* स्वराज्य ह्मणजे जो देश शिवाजीचे अंतकाळीं त्याच्या स्वाधीन होता तो.

## २. पहिले बाजीराव साहेब ह्यांचें वर्णन.

इसवी सन १७२० ह्मणजे शके १६४२ ह्यावर्षा पासून इसवी सन १७४० म्हणजे शके १६६२ ह्या वर्षापर्यंत झालेलीं वर्त्तमानें.

१. पहिला बाजीराव साहेब कोणत्या प्रकारचा होता?

तो शूर होता, आणि युद्धाचे कामांत फार कुशल होता.

२. त्यानें पेशवाईचा अधिकार किती दिवस चालविला?

वीस वर्षेपर्यंत पेशवाईचा अधिकार चालवून इसवी सन १७४० ह्मणजे शके १६६२ ह्यावर्षीं तो मृत्यु पावला. तो होता त्यावेळेस शाहुराजानें सर्व राज्याचें काम त्याजकडे सांगितलें होतें. त्याचा भाऊ चिमणाजी आपा हा फार शहाणा आणि शूर होता. हा आपले वडील भावास लढाया वगैरे दुसरीं कामें करण्याविषयीं फार उपयोगी पडत असे.

३. पहिला बाजीराव साहेब ह्यानें शूरत्वाचीं जीं जीं कृत्यें केलीं त्यांतून कित्येकांचें वर्णन कर.

इसवी सन १७३१ ह्मणजे शके १६५३ ह्या वर्षा बडोद्याजवळ ह्याची आणि त्रिंबकराव दाभाडे म्हणून जो सेनापति होता त्याची एक मोठी लढाई झाली. त्या लढाईत ह्यास मोठा जय प्राप्त होऊन त्रिंबकराव दाभाडा ठार मारिला गेला. ह्यानें नबाब सरकाराशीं आणखी दोन लढाया केल्या, त्या दोन्ही लढायांत

ह्यानें त्याच्या भोंवतालीं वेरा घालून आपणास पाहिजे तसा त्याजपासून करार करून घेऊन नंतर त्याशीं सल्ला केला. हा आपलें सैन्य बरोबर घेऊन सर्व हिंदुस्थानांत खंडणी घेत फिरे.

४. ह्यानें ह्या अशा लढाया करून मराठी राज्यास कोणता लाभ मिळविला?

नर्मदेच्या पलीकडे गुजराथ आणि माळवा ह्या द प्रांतांची चौथाई व सरदेशमुखी हे दोन हक्क त्यानें दिल्लीच्या बादशाहापासून संपादिले, त्याकाळीं हिंदुस्थानांत मराठ्यांशीं लढाई करण्याविषयीं एक निजाम उल्मुलुख मात्र समर्थ होता. तो निजाम उल्मुलुख शेवटीं पराभव पावून त्यास माळवाप्रांत सोडून देणें प्राप्त झालें.

५. हिंदुस्थानांत सांप्रत काळच्या सरदारांतून त्याच्या कारकिर्दीत कोण कोण उत्कर्ष पावले.

त्याचे कारकिर्दीत होळकर व शिंदे व गाईकवाड हे तिवेजण उत्कर्ष पावले. त्यांत शिंदे ह्यांचे पूर्वज पूर्वीच सरदार होते; त्यांच्या वंशांतील कोणाएकाची कन्या पाहून अवरंगजेब बादषाह ह्यानें शाहुराजाचें लग्न केलें होतें. ते शिंदे कन्हेरखेड म्हणून एक साताऱ्याजवळ गांव आहे, तेथील पाटील होते. त्यावेळेस ते इतक्या लहान योग्यतेचे होते कीं, राणोजी शिंदा पहिले बाजीराव साहेब ह्यांजवळ हुजऱ्या होता. राजाराम

राजा राज्य करीत असतां जो परसोजी भोंसला नागपुरचे राजाचा पूर्वज होता तो प्रसिद्ध होता; परंतु त्याचे कुळांतील रघोजी भोंसला म्हणून एक पुरुष होता, त्यानें सेनासाहेब सुभा असा किताब व वराड प्रांतांतील नागपुरचें संस्थान हीं दोन्ही बाजीराव साहेब ह्यांच्या कारकिर्दींत संपादिलीं. जरी शाहुराजाचें आणि नागपुरवाले ह्यांचें आडनांव एकच आहे, तरी शाहुराजांचा व ह्या भोंसल्यांचा अगदीं संबंध नाहीं.

६. तो बाजीराव साहेब राज्य चालवीत असतां हिंदुस्थानांत कोणी स्वारी केली होती?

इसवी सन १७३६ म्हणजे शके १६५८ ह्या वर्षीं नादिरषाह म्हणून जो इराण देशचा बादषाह होता, तो हिंदुस्थानांवर स्वारी करून दिल्लीपर्यंत गेला. त्या शहरच्या हजारों मनुष्यांस मारून, आणि सुमारें ७० कोटि रुपयांची लूट मिळवून त्यानें बादषाहास पुनः त्याचे तख्तावर बसविलें. आणि तो एक महिनाभर त्या शहरांत राहून इराण देशास माघारा गेला.

७. त्या पेशव्यानें पोर्तुगाल देशच्या लोकांशीं कोणती लढाई केली?

त्यावेळेस साष्टी बेट पोर्तुगाल देशच्या लोकांचे स्वाधीन होतें; त्या पोर्तुगाल देशच्या लोकांशीं आणि मराठ्यांशीं कांहीं कलह लागल्यावरून मराठे लोकांचें एक मोठें सैन्य त्यांजवर

जाऊन तें बेट त्यांजपासून त्यानें घेतलें. ह्या लढाईमध्यें पहि-
ला चिमणाजी आपा जो, तो त्या लोकांशीं युद्ध करून जय-
पावला, त्यामुळें त्याची कीर्ति फार वाढली. त्यापूर्वी इसवी
सन १७६१ ह्मणजे शके १६८३ ह्या वर्षी पोर्तुगाल देशच्या
लोकांनीं इंग्रज लोकांस मुंबईचें बेट दिलें होतें. त्यावेळेस
तेथें फार थोडी वस्ती होती.

८. त्या बाजीराव साहेबास किती पुत्र होते?

त्या बाजीराव साहेबास तीन पुत्र होते, त्यांत वडील पुत्र बाळाजीपंत, त्यास फारकरून लोक नानासाहेब असें म्हणत असत. तो आपले बापाचे पाठीमागें पेशवाईचें काम चालवूं लागला. दुसऱ्या पुत्राचें नांव० रघुनाथराव, आणि तिसरा पुत्र जनार्दन पंत, तो लहानपणीं मृत्यु पावला

---

## बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब ह्यांचें वर्णन.

इसवी सन १७४० म्हणजे शके १६६२ ह्या वर्षापासून इसवी सन १७६१ म्हणजे शके १६८३ ह्या वर्षापर्यंत झालेलीं वर्तमानें.

१. नानासाहेब ह्यानें पेशवाईचें काम किती दिवस चालविलें?

नानासाहेब ह्यानें पेशवाईचें काम २१ वर्षें चालविलें.

२. त्याच्या कारकीर्दीत कोणतें शहर मराठी राज्याचे राजधानी झालें?

त्याच्या कारकिर्दीत पुणें शहर मराठी राज्याची राजधा झालें.

३. नानासाहेब पेशवाईचें काम चालवूं लागला त्यावे ळेस त्याला कोणता शत्रु उत्पन्न झाला, व शत्रूचा आ त्याचा कसकसा तह ठरला?

नागपूरचा सरदार रघोजी भोंसला फार फौजबंद होता तो नानासाहेब पेशवा ह्याशीं द्वेष करूं लागला, त्यावेळे शाहुराजानें त्या दोघांचा आपण मध्यस्थ होऊन कांहीं ठरा करवून कलह नाहींसा केला. त्या ठरावांत असें ठरलें होतें कीं, बंगाला, बहार व अयोध्या ह्या तिन्हीं प्रांतांतील जे मराठ्यांचे हक्क होते, ते पेशव्यांनीं रघोजी भोंसला ह्यास सोडून द्यावे, आणि माळवा प्रांत व हिंदुस्थानाच्या पश्चिमेक डील जे प्रांत त्यांचे हक्क पेशवे ह्यांनीं घ्यावे.

४. नानासाहेबाच्या कारकिर्दीत राज्य चालविण्याविषयीं त्याचें साह्य करणारे कोण कोण होते?

त्याचा धाकटा भाऊ रघुनाथराव ह्याजकडे संपूर्ण फौजेचें काम होतें, आणि चुलत बंधु सदाशिवराव भाऊ ह्याजकडे संपूर्ण राजकीय काम होतें.

५. नानासाहेब पेशवा कोणत्या प्रकारचा मनुष्य होता?

नानासाहेब पेशवा राजकीय कामांत फार चतुर होता, परंतु अत्यंत कपटी असे. जरी तो फार आळसी आणि विलासी होता, तरी त्याचा धाकटा बंधु आणि चुलत बंधु हे दोघे आपआपल्या कामांत फार उद्युक्त होते, ह्यामुळें त्याच्या कुटुंबाचें महत्व न्यून झालें नाहीं.

३. भाऊसाहेबानें मराठी देशाचा बंदोबस्त करण्याविषयीं कोण कारभारी नेमिला होता?

रामचंद्र बाबा म्हणून एक शेणवई होता, त्यास त्यानें त्या देशाचा बंदोबस्त करावयाकरितां नेमिलें होतें. तो शेणवई व सदाशिवराव भाऊ ह्या दोघांनीं पूर्वीं शिवाजी राजाच्या वेळेपासून राज्यांत जी अव्यवस्था झाली होती, ती मोडून टाकून पुनः यथास्थित व्यवस्था केली.

७. त्याच्या कारकिर्दीत मराठ्यांनीं कोणत्या स्वाऱ्या केल्या?

त्याच्या कारकिर्दीत मराठे लोक हिंदुस्थानांत आणि करनाटकांत स्वाऱ्या करीत होते, त्या वेळेस मराठे लोक बलिष्ठ होते, आणि दिल्लीच्या राज्यांतील मुख्य कारभारी लोकांशीं त्यांचा ऐक्यभाव होता; ह्मणून दिल्लीस कांहीं राज्यप्रकरणीं उलटापालट होऊं लागल्यास ती मराठे लोकांच्या साह्यावांचून होत नसे.

८. नानासाहेब पेशवाईचें काम करीत असतां हिंदुस्थानांत कोणी स्वारी केली?

अहंमदषाह अबदाली म्हणून जो अफगाण लोकांचा राजा

ता त्या वेळेस काबूल व पश्चिम इराण ह्या देशांचें राज्य करीत होता, त्यानें इसवी सन १७४८ ह्मणजे शक १६७० ह्या वर्षी हिंदुस्थानांत पहिल्यानें स्वारी करून पंजाब प्रांत आपले स्वाधीन करून घेतला. त्या अफगाण लोकांस मराठे लोक गिलची असें ह्मणतात.

९. त्याच वर्षी दुसरें कोणतें वर्त्तमान झालें?

त्याच वर्षी निजाम उल्मुलुख मृत्यु पावला. त्याचें वय १०४ वर्षांचें होतें असें म्हणतात. तो मरण पावल्यानंतर त्याचे राज्यांत बारा वर्षांपर्यंत अव्यवस्था होती. पुढें त्याच्या एका पुत्रास संपूर्ण राज्याचा अधिकार प्राप्त झाला. त्याचें नांव निजामअली होतें.

१०. नानासाहेबाचे कारकिर्दींत मराठे लोकांनीं हिंदुस्थानांत किती स्वाऱ्या केल्या?

नानासाहेबाचे कारकिर्दींत मराठे लोकांनीं हिंदुस्थानांत तीन स्वाऱ्या केल्या; त्यांतून दोन स्वाऱ्या रघुनाथराव ह्यानें केल्या. इसवी सन १७५८ म्हणजे शके १६८० ह्या वर्षी त्यानें आपल्या दुसऱ्या स्वारीच्या वेळेस पंजाब येथें जाऊन गिलच्यांचा जो सुभेदार त्यास तेथून घालवून आपल्या मराठ्यांचा अम्मल बसविला; परंतु त्याला तेथील कांहीं वसूल प्राप्त झाला नाहीं, आणि फौजेस फार खर्च लागूं लागला. ह्यास्तव त्यानें मल्हारराव होळकर आणि कांहीं शिंद्याकडील लोक ह्यांस हिंदुस्थानांत वसूल करावयाकरितां ठेविलें.

११. त्यानंतर काय वर्तमान झालें?

त्यानंतर अहंमदशाह नामक राजा मोठी फौज घेऊन मराठे लोकांशीं युद्ध करावयाकरितां हिंदुस्थानांत आला, ह्यामुळें सदाशिवराव भाऊ व विश्वासराव – जो पेशव्याचा वडील पुत्र—ह्या दोघांस त्याशीं युद्ध करावयाकरितां हिंदुस्थानांत स्वारी करणें प्राप्त झालें.

१२. हिंदुस्थानामध्यें भाऊसाहेब ह्यानें किती फौज नेली होती?

हिंदुस्थानामध्यें भाऊसाहेब ह्यानें अहंमदषाह राजा जो आपला शत्रु त्याशीं युद्ध करावयाकरितां शिंदे, होळकर, व गाईकवाड, आणखी दुसरे कितीएक सरदार, ह्यांस आपल्या बराबर न्यावयाकरितां बोलाविलें होतें. त्या वेळेस भाऊसाहेब ह्याजबरोबर १५००० पायदळ, ५५,००० स्वार, व २०० तोफा अशी फौज होती. त्या फौजेशिवाय बाजार बुणगें २,००,००० होतें. तेसमयीं भाऊसाहेबाच्या लष्कराचा सरंजाम अशा थाटाचा होता कीं, अवरंगजेब बादषाहाचे कारकिर्दीपासून असा कधीं कोणी दुसरा पाहिला नव्हता. गिलची लोकांचीही मराठ्यांसारखीच फौज होती, परंतु त्यांचें पायदळ ह्यांपेक्षां अधिक होतें, आणि स्वार ह्यांपेक्षां कमी होते.

१३. ह्या तिसरे लढाईचा परिणाम काय झाला?

ह्या तिसरे लढाईंत सोनपत पानपत ह्या जागीं मराठे लोकांचा फार मोठा नाश झाला.

१४. पानपतची लढाई होण्याचे पूर्वीं काय वर्तमान झालें?

इसवी सन १७६० म्हणजे शके १६८२ ह्यावर्षीं मराठे लोकांनीं दिल्ली शहर हस्तगत करून घेऊन पर्जन्यकाळीं तेथें छावणी करून ते राहिले होते, त्यानंतर मराठे लोक सोनपत पानपत येथें गेले असतां दोन्ही लष्करांचे सरदार येऊन एकमेकांस भेटत होते. ह्यावरून पहिल्यानें त्या उभयतांचा सल्ला होईल असें दिसत होतें, परंतु दोन महिने झाल्यावर मराठी फौजेमध्यें धान्याचा तोटा फार पडला; त्या कारणास्तव त्यांस युद्धाखेरीज दुसरा उपाय नाहींसा झाला.

१५. सोनपत पानपतची लढाई कधीं झाली?

इसवी सन १७६१ म्हणजे शके १६८३ ह्या वर्षीं जानेवारी महिन्याच्या सातव्या तारखेस सोनपत पानपतची लढाई झाली.

१६. मराठे लोकांचा पराभव होण्याचें काय कारण झालें?

त्याचें कारण इतकेंच कीं, भाऊसाहेब ह्यानें पूर्वीं निजामअलीशीं युद्ध करून जय मिळविला होता, त्यामुळें त्याच्या बुद्धीस गर्वानें अंतर पडलें. युक्तीनें युद्ध करावयाचें तें केलें नाहीं, म्हणून तो पराभव पावता झाला.

१७. त्या लढाईमध्यें मराठे लोकांचें किती सैन्य नाशापत पावलें ?

त्या लढाईमध्यें मराठे लोकांचें सैन्य सुमारें तीन चतुर्थांश म्हणजे दोन लक्ष मनुष्यें नाशापत पावलीं.

१८. मराठ्यांचे सरदारांतून कोणकोणते सरदार मेले, आणि कोणते माघारे आले ?

विश्वासराव असाध्य जखम लागून पडला, असें वर्तमान भाऊ साहेबास कळल्यावर तो आपल्या हत्तीवरून खालीं उतरून घोड्यावर बसून युद्धाच्या गर्दीत शिरला तो पुनः दृष्टीस पडला नाहीं, आणि त्या युद्धांतही मराठ्यांचे सरदारांतून गोविंदपंत बुंदेले व गणपतराव मेहेंदळे हे दोघे रणभूमीवर पूर्वी ठार मारले गेले. जनकोजी शिंदे आणि पेशव्यांचे पायदळाचा सरदार जो इब्राहीमखान गारदी ह्या दोघांस शत्रूंनीं धरून नेऊन ठार मारिलें. मल्हारराव होळकर आणि दमाजी गाईकवाड हे उभयतां पहिल्यांनीच पळून माघारे आले. तसेच विंचुरकर व राजेबहादर हे दोघे दिल्लीच्या बंदोबस्ताकरितां ठेविले होते, तेही माघारे आले. त्या लढाईत जे लोक मेले त्यांच्या शोकानें संपूर्ण महाराष्ट्र देश व्यापिला होता.

१९. गिलची लोकांचें शूरत्व कोणत्या प्रकारानें प्रसिद्धीस आलें ?

त्यांनीं मराठे लोकांच्या पळामध्यें जीं माणसें सांपडलीं

होतीं, त्यांतील बायका आणि मुलें खेरीज करून सर्वांस मारून टाकिलें. त्या बायकांस दासी आणि मुलांस गुलाम करून ठेविलें.

२०. हें दुःखकारक वर्त्तमान ऐकून नानासाहेब ह्याची काय अवस्था झाली?

हें दुःखकारक वर्त्तमान ऐकून त्यास जो धक्का बसला त्यापासून तो कधीं बरा झाला नाहीं. नंतर दुखणाईत होऊन थोडक्या महिन्यांनीं मृत्यु पावला.

२१. त्याच्या कारकिर्दींत राज्याची स्थिति कोणत्या प्रकारची होती?

त्याच्या कारकिर्दीत सोनपतपानपत येथील लढाईच्या पूर्वीं मराठी राज्याचा पूर्ण उत्कर्ष झाला होता. ह्या लढाईमध्यें मराठे लोकांचा जो अनिर्वाच्य नाश झाला त्या नाशापासून त्यांस पुनः पूर्वस्थितीवर येण्यास फार कालांतर लागलें.

२२. नानासाहेब ह्यांनीं इंग्रेज लोकांशीं कोणत्या प्रकारानें सख्य ठेविलें होतें?

कोंकणांत कितीएक लढायांमध्यें इंग्रेज लोकांनीं भाऊसाहेबांचें साह्य केलें होतें, त्या कारणास्तव त्यानें त्यांस बाणकोट आणि त्याच्या भोंवतालचे दुसरे नऊ गांव बक्षीस दिले.

---

## पहिले माधवराव साहेब ह्यांचें वर्णन.

इसवी सन १७६१ म्हणजे शके १६८२ ह्या वर्षा पासून

पासून इसवी सन १७७२ म्हणजे शके १६९४ ह्या वर्षापर्यंत झालेलीं वर्त्तमानें.

१. बाळाजी बाजीराव मरण पावल्यानंतर त्याचे गादी वर कोण बसला?

बाळाजी बाजीराव मरण पावल्यानंतर त्याचा थोरला पुत्र माधवराव साहेब त्याचे गादीवर बसला.

२. त्यानें पेशवाईचें काम किती दिवस चालविलें?

त्यानें पेशवाईचें काम सुमारें ११ वर्षें पर्यंत चालवून पुढें इसवी सन १७७२ म्हणजे शके १६९४ ह्या वर्षीं निःसंतान होऊन मरण पावला.

३. माधवराव साहेब पेशवा ह्याचे काय उत्तम गुण होते?

त्याच्या गुणांमध्यें प्रामाणिकपणा आणि धैर्य हे दोन गुण मोठे होते. त्याच्या कारकिर्दींत जे लोक निर्बळ लोकांस पीडा करणारे होते, आणि जे लोक दुष्कर्मी होते, त्यांचें शासन करून तो गरीब लोकांचें संरक्षण करीत असे. त्यावेळेस गांवांतून गरीब लोकांस वेगारी धरून नेण्याची चाल बहुत दिवस पडलेली होती, ती त्यानें अगदीं मोडून टाकिली. पुढें विसाजीपंत म्हणून एक वसईचा सुभेदार होता, त्याला तें वर्त्तमान माहित असतां त्यानें आपले कांहीं जिन्नस गांवाचे लोक वेगारी धरून नेले होते. तें वर्त्तमान माधवराव साहेब ह्यास कळतांच त्यानें सर्व जिन्नसांची जप्ती केली, आणि

बेगारी लोकांचें रोज कुळून दिलें. सारांश, त्याजमध्यें लढाई करण्याविषयीं शूरत्व, आणि राज्य चालविण्याविषयीं कुशलत्व असें फार होतें कीं, त्याचें अल्पवयांतील मरण संपूर्ण मराठे लोकांस फार अनर्थाचें व दुःखाचें कारण झालें.

४. त्याच्या कारकिर्दींत कोणता कलह उत्पन्न झाला?

त्याचा चुलता जो राघोबादादा त्यानें त्याशीं कलह केला, म्हणून माधवराव साहेब ह्यानें त्यास पुण्यामध्यें कैद करून ठेविलें.

५. राघोबादादा कोणत्या प्रकारचा मनुष्य होता?

तो फार शूर होता, आणि त्यावेळेस ज्या लढाया झाल्या, त्यांत तो प्रमुख होता, परंतु राजकीय कामाचे उपयोगीं नव्हता. पेशवाईची गादी आपणास प्राप्त व्हावी अशी त्याची इच्छा होती, ह्यामुळें त्याचें आणि त्याच्या पुतण्याचें वैमनस्य पडलें.

६. माधवराव साहेब कोणत्या रोगानें मृत्यु पावला, आणि त्यावेळेस त्याचें वय किती वर्षांचें होतें?

माधवराव साहेब ह्यास क्षयरोग लागून तो थेऊर गांवीं मरण पावला. त्यावेळेस त्याचें वय २८ वर्षांचें होतें.

७. तो मरण पावला त्याकाळीं मराठी राज्यांत किती वसूल उत्पन्न होत होता?

तो मरण पावला त्यावेळीं शिंदे, होळकर, गाईकवाडे, आणि लहान लहान सरदार ह्यांच्या मुलखांसुद्धां बहा कोटींचा वसूल म्हणावयास मात्र होता, परंतु वास्तविक वसूल सुमारें सात कोटि रुपये होता.

८. त्याच्या कारकिर्दीत म्हैसूर प्रांतांत स्वतंत्र राज्याची स्थापना करून मराठे लोकांशीं लढाया करूं लागला, तो कोण होता ?

त्याच्या कारकिर्दीत म्हैसूर प्रांतांत हैदर अली हा स्वतंत्र राज्याची स्थापना करून मराठ्यांशीं लढाया करूं लागला.

९. माधवराव साहेब ह्याच्या कारभाऱ्यांमध्यें जो कारभारी पुढें प्रसिद्ध झाला तो कोण होता ?

माधवरावसाहेब ह्याच्या कारभाऱ्यांमध्यें एक बाळाजीपंत भानू म्हणून कारभारी होता, त्याला फार करून लोक नाना फडनवीस असें म्हणत असत, त्याच्या वडिलांपासून फडनविशीचें काम त्याजकडे होतें. जसा शिवाजीच्या वेळेस पंत अमात्य, तसा पेशव्यांच्या वेळेस फडनवीस.

---

## नारायणराव आणि रघुनाथराव ह्याचें वर्णन.

इसवी सन १७७२ म्हणजे शके १६९४ ह्या वर्षापासून

इसवी सन १७७४ म्हणजे शके १६९६ ह्या वर्षापर्यंत झालेलीं वर्त्तमानें.

१. थोरले माधवराव साहेब मरण पावल्यानंतर पेशवाईचे गादीवर कोण बसला होता?

थोरले माधवराव साहेब मरण पावल्यानंतर त्यांचा बंधु जो नारायणराव साहेब तो पेशवाईच्या गादीवर बसला.

२. त्यानें पेशवाईचें काम किती दिवस चालविलें?

त्यानें पेशवाईचें काम आठ महिनेपर्यंत केलें. नंतर त्याचा चुलता जो राघोबा दादा ह्यानें त्यास पुण्यामध्यें मारेकरी पाठवून ठार मारविलें; आणि आपण पेशवाईचे गादीवर बसला.

३. नारायणराव मरण पावल्यानंतर काय वर्त्तमान झालें?

नारायणराव साहेब मरण पावल्यानंतर रघुनाथराव ह्याजविषयीं संपूर्ण कारभारी लोकांच्या मनामध्यें फार संशय उत्पन्न झाला.

४. त्या कारभारी लोकांनीं रघुनाथराव ह्यांस पेशवाईचे कामावरून काढून टाकण्याविषयीं कोणता प्रयत्न केला?

जेव्हां नारायणराव साहेब मारिला गेला, तेव्हां त्याची बायको गंगाबाई गरोदर होती, तिला मग थोडक्या दिवसांनीं पुत्र झाला. त्यानंतर जे राघोबा दादाचे प्रतिपक्षी होते, त्यांनीं त्या मुलास गादीवर बसवून त्याचें नांव माधवराव साहेब

असें ठविलें, आणि त्याच्या नांवाची चहूंकडे द्वाही फिरविली. त्यावेळेस नानाफडनवीस संपूर्ण राज्याचा कारभार करीत होता.

---

## धाकटे माधवराव साहेब ह्यांचें वर्णन.

इसवी सन १७७४ ह्मणजे शके १६९६ ह्या वर्षापासून इसवी सन १७९६ ह्मणजे शके १७१८ ह्यावर्षापर्यंत झालेलीं वर्तमानें.

१. धाकटे माधवराव साहेब ह्यांचें प्रसिद्ध नांव काय होतें?

त्यांचें प्रसिद्ध नांव सवाई माधवराव असें होतें.

२. राघोबा दादा आपणास साहाय्य करून घेण्याविषयीं कोणाकडे गेला?

राघोबा दादा आपणास साहाय्य करून घेण्याविषयीं इंग्रज लोकांकडे गेला. त्यानें त्यांस असें सांगितलें कीं जर तुम्ही मला पुनः पेशवाईचे गादीवर बसवाल, तर साष्टी बेट व वसई गांव व गुजराथेंतील कांहीं प्रांत हे तुम्हांस देईन. तें साष्टी बेट घेण्याविषयीं पूर्वी इंग्रज लोकांस फार दिवस इच्छा होती. तें बोलणें होत होतें तों इतक्यांत पोर्तुगाल देशच्या लोकांच्या बादशाहाकडून साष्टी वगैरे संस्थानें हिंदु लोकांपासून माघारीं घ्यावया करितां कांहीं फौज येणार आहे,

अशी वार्ता उठली. त्यानंतर मुंबई सरकारानें त्वरा करून तें बेट तत्काळ हस्तगत करून घेतलें.

४. मुंबई सरकारानें राघोबा दादा ह्यास पेशवाईचे गादीवर पुन्हा बसविण्याविषयीं जो निश्चय केला होता, तो कां सोडून दिला?

त्याचें कारण असें झालें कीं, त्यावेळेस कलकत्त्याचा गवर्नर जनरल साहेब ह्याच्या आज्ञेंत मुंबई व मद्रास हीं दोन संस्थानें असावीं असा नेम ठरला होता, तेव्हांच त्या गवर्नर जनरल साहेबानें तें मागचें संपूर्ण बोलणें मोडून टाकून नानाफडनवीस ह्याशीं व दुसरे कारभारी लोकांशीं तहाचें बोलणें करण्याविषयीं आपला एक वकील पाठविला. त्या तहामध्यें मराठे लोकांनीं साष्टी बेट इंग्रज लोकांकडेसच ठेविलें. आणि राघोबा दादा ह्यास कोंपरगांव येथें नेऊन ठेवूं, व त्यास कांहीं नेमणूक करून देऊं, असा ठराव केला.

४. राघोबा दादा ह्याचें पुढील वर्त्तमान काय झालें?

त्यावेळेस त्यानें पेशवाई मिळविण्याचा बेत सोडिला नाहीं; परंतु कांहीं दिवसानंतर आपले सर्व उपाय व्यर्थ गेले असें पाहून लढाई सोडायास कबूल झाला, आणि कोंपरगांवास जाऊन तेथें इसवी सन १७८४ म्हणजे शके १७०६ ह्यावर्षी तो मृत्यु पावला. त्या राघोबा दादास दोन औरस पुत्र होते; त्यांतून एक वडील पुत्र बाजीराव

साहेब, तो पुढें पेशवाईचे गादीवर बसला; आणि दुसऱ्या पुत्राचें नांव चिमणाजी आपा, असें होतें. आणखी अमृतराव साहेब म्हणून एक त्यास दत्तक पुत्र होता.

५. सवाई माधवराव साहेब ह्यानें पेशवाईचें काम किती दिवस चालविलें?

तो जन्मला त्याच वेळीं त्याच्या आईनें राजापासून पेशवाईचीं वस्त्रें त्याला देवविलीं. मग त्यानें पेशवाईचें काम एकवीस वर्षें चालविलें. परंतु तो अगदीं नानाफडनवीस ह्याच्या स्वाधीन होता; त्यामुळें त्यास अत्यंत त्रास उत्पन्न होऊन त्यानें आपल्या वाड्यांतील तिसऱ्या मजल्यावरून खालीं उडी टाकिली. त्यावेळेस त्याचा पाय मोडून दोहों दिवसांनीं इसवी सन १७९६ म्हणजे शके १७१८ ह्या वर्षीं आश्विनमासीं तो मृत्यु पावला.

६. माधवराव नारायण ह्याच्या कारकिर्दींत नानाफडनवीस ह्याचा अधिकार काढण्याविषयीं कोण प्रयत्न करीत होता?

माधवराव नारायण ह्याच्या कारकिर्दींत महादजी शिंदा हा नानाफडनवीस ह्याचा अधिकार काढण्याविषयीं प्रयत्न करीत होता. तो बलवान् आणि कुशल होता, म्हणून जसे पूर्वीं नानाफडनविसाचे सर्व शत्रु त्यास वश झाले होते, तसा हा वश झाला नाहीं. तो महादजी शिंदा इसवी सन १७९४

म्हणजे शके १७१६ ह्यावर्षी पुण्याजवळ वानवडी मुकामीं अकस्मात् मृत्यु पावला. नंतर त्याच्या भावाचा नातू जो दवलतराव शिंदा तो त्याच्या पाठीमागें त्याचा अधिकार चालवूं लागला.

७. नानाफडनवीस राज्याचा कारभार चालवीत असतां त्याचे हाताखालीं मराठी फौजेचे कोण कोण मोठे सरदार होते?

नानाफडनवीस मराठी राज्याचा कारभार करीत असतां त्याचे हाताखालीं हरिपंत फडके आणि परशुरामपंत भाऊ पटवर्धन हे दोघे फौजेचे मोठे सरदार होते.

८. त्यावेळेस कोण कोणत्या लढाया झाल्या?

मोरोबादादा फडनवीस जो नानाफडनवीस ह्याचा चुलतबंधु, त्यानें राघोबा दादा ह्याजला पेशवाईचे गादीवर पुनः बसवायाकरितां मुंबईच्या सरकारास बोलाविलें होतें, परंतु इंग्रेज लोक पुण्यास येत असतां वडगांव मुकामीं त्यांचा पराभव होऊन ते माघारे गेले. नंतर मराठे लोक आणि इंग्रेज लोक ह्यांमध्यें तीन वर्षें पर्यंत लढाई लागली होती, परंतु ती लढाई वर्णावयाजोगी नाहीं. शेवटीं सल्ला होऊन उभयतांचा कलह समाप्त झाला. त्यापुढें इसवी सन १७९५ म्हणजे शके १७१७ ह्यावर्षी मराठे लोक आणि निजामअली ह्या दोघांची खरडे मुकामीं मोठी लढाई झाली. तिजमध्यें मराठ्यांस मोठा

जय प्राप्त झाला, आणि त्यांनीं निजामअल्लीपासून खंडणीबद्दल त्याच्या राज्यांतील कांहीं मुलूख आपल्याकडे लावून घेतला. सवाई माधवराव ह्याच्या कारकिर्दींत चोहींकडेस मराठे लोकांच्या आणि दुसऱ्या लोकांच्या लढाया लागल्या होत्या. त्यांमध्यें विशेषेंकरून हैदरअल्ली व त्याचा पुत्र जो टिपूसुलतान ह्यांचा व मराठे लोकांचा कलह चालला होता.

---

## दुसरे बाजीराव साहेब यांचें वर्णन.

इसवी सन १७९६ म्हणजे शके १७१८ ह्या वर्षापासून इसवी सन १८१८ म्हणजे शके १७४० ह्या वर्षापर्यंत झालेलीं वर्तमानें.

१. माधवराव नारायण मरण पावल्यानंतर पेशवाईचे गादीवर कोण बसला?

माधवराव नारायण मरण पावल्यानंतर इसवी सन १७९६ म्हणजे शके १७१८ ह्यावर्षीं राघोबा दादा ह्याचा जो वडील पुत्र बाजीराव साहेब तो पेशवाईचे गादीवर बसला. हा बाजीराव साहेब आणि नानाफडनवीस ह्या दोघांमध्यें फार वांकडें पडलें होतें. पेशवाईचे गादीवर त्यानें बसूं नये असा नानाफडनविसाचा बेत होता. परंतु तो बेत सिद्धीस गेला नाहीं.

२. पुढें नानाफडनवीस ह्याचा काय वृत्तांत झाला?

पुढें नानाफडनवीस हा आपला मुख्य कारभारी बाजीराव साहेबानें करून ठेविला होता, परंतु बाजीराव साहेब ह्यांचे मनांत त्याला कारभारांतून काढून टाकावें असें होतें. आणि ज्यावेळेस त्याला संधी सांपडली, त्यावेळेस त्यानें, नानाफडनवीस ह्यास प्रतिबंध करण्याविषयीं दवलतरावशिंदे ह्यास सूचना केली; नंतर दवलतराव शिंदे ह्यानें नानाफडनवीस ह्यास नगरचे किल्ल्यांत नेऊन ठेविलें; परंतु त्याला बंदींतून मुक्त करून त्याजकडे कारभार पुनः सांगणें हें बाजीराव साहेबास लवकरच प्राप्त झालें. पुढें नाना थोडक्याच दिवसांनीं इसवी सन १८०० म्हणजे शके १७२२ ह्या वर्षीं मृत्यु पावला.

३. नानाफडनवीस ह्याच्या गुणांचें वर्णन कसकसें केलें आहे?

तो राज्याचा कारभार करीत असतां त्यानें आपल्या बुद्धीच्या कौशल्यानें मराठी राज्याचा उत्कर्ष करून राज्य संरक्षण केलें. राज्यकारभार चालविण्याविषयीं असा कुशल हिंदुस्थानांत त्या काळीं दुसरा कोणी पुरुष नव्हता; आणि ज्या काळीं तो मृत्यु पावला, त्या काळीं मराठी राज्यांतील चातुर्य आणि प्रामाणिकपणा हीं त्याजबरोबरच गेलीं असें लोक म्हणूं लागले.

४. बाजीराव साहेब पेशवाईचे गादीवर बसल्यानंतर पुणें शहर लुटण्याचें कारण काय झालें?

बाजीराव साहेब ह्यानें दवलतराव शिंदा ह्यास आपणास पेशवाईचे गादीवर बसविण्याबद्दल दोन कोटि रुपये देऊं केले होते, परंतु बाजीराव साहेब ह्याजपाशीं ज्या वेळेस त्यानें तो पैका मागितला त्या वेळेस त्याजवळ कांहीं द्रव्य नव्हतें, म्हणून पुण्यांत जे मातबर लोक होते, त्यांजपासून द्रव्य घ्यावें असा त्या दोघांनीं निश्चय करून पुष्कळ लोकांजवळून बलात्कारानें हाणमार करून द्रव्य उत्पन्न केलें.

५. इसवी सन १८०२ म्हणजे शके १७२४ ह्या वर्षीं बाजीराव साहेबास पुण्यांतून पळून जावयाचें काय कारण झालें?

त्याचें कारण असें कीं, दवलतराव शिंदा पुणें मुक्कामीं आपली थोडीशी फौज ठेवून आपण हिंदुस्थानांत आपले राज्याचें संरक्षण करावयाकरितां गेला होता. इतक्यामध्यें यशवंतराव होळकर ह्यानें पुण्यास येऊन पेशवे व शिंदे ह्या दोघांच्या फौजांचा पराभव केला, म्हणून बाजीराव ह्यास पळून जाणें प्राप्त झालें.

६. बाजीराव साहेब कोणीकडे पळून गेला?

बाजीराव साहेब पहिल्यानें रायगड येथें पळून गेला, नंतर तेथून निघून वसईस गेला. तेथें त्यानें इंग्रज लोकांशीं कांहीं बोली करून ठराव केला.

७. त्या ठरावामध्यें कसकसें ठरलें होतें?

त्या उभयतांच्या बोलण्यामध्यें असें ठरलें होतें कीं,

आला होता, त्यास त्यानें ठार मारविलें. हेंच ल मूळ कारण झालें.

१३. गंगाधर शास्त्री पुण्यास येण्याचें काय कारण ?

गंगाधर शास्त्री गाईकवाड सरकार ह्याजकडील राहिलेली खंडणी ती बाजीराव साहेब ह्या [illegible] याविषयींचें बोलणें करावयाकरितां इंग्रेज सरकारचे बाहेदारीनें पुण्यास आला होता.

१४. गंगाधर शास्त्री ह्यास कोणत्या वर्षीं आणि कोणत्या ठिकाणीं मारविलें ?

इसवी सन १८१५ म्हणजे शके १७३७ ह्या वर्षीं गंगाधर शास्त्री ह्यास पंढरपूर येथें मारविलें.

१५ गंगाधर शास्त्री ह्यास कोणी मारविलें ?

गंगाधर शास्त्री ह्यास त्रिंबकजी डेंगळा ह्यानें बाजीरावसाहेब ह्याच्या सांगण्यावरून ठार मारिलें.

१६. त्रिंबकजी डेंगळा कोण होता ?

त्रिंबकजी डेंगळा हा पूर्वीं हलक्या योग्यतेचा मनुष्य होता, परंतु बाजीराव साहेब ह्यास तो प्रिय वाटून त्यानें त्यास मोठमोठीं कामें सांगून वाढविलें.

१७. त्यानंतर काय वृत्तांत झाला ?

बाजीरावसाहेब ह्यास त्रिंबकजी डेंगळा ह्याला इंग्रेज लोकांच्या स्वाधीन करणें प्राप्त झालें. त्रिंबकजी डेंगळा ह्यास इंग्रेज लोकांनीं ठाण्याच्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें, परंतु

तो तेथून पळून गेला. त्यानंतर इंग्रज लोकांनीं इसवी सन १८१८ ह्मणजे शके १७४० ह्या वर्षी पुनः त्याला धरून आणून जन्मपर्यंत चंद्रगड म्हणून एक काशी प्रांतांत किल्ला आहे, त्यांत नेऊन ठेविलें.

१८. त्यानंतर बाजीरावसाहेब आणि इंग्रेजलोक ह्यांच्या मध्यें कोणत्या प्रकारचा नवीन करार झाला?

पूर्वी वसई मुक्कामीं करार झाला होता त्या समयीं जें बाजीरावसाहेब ह्याचें स्वातंत्र्य होतें, त्यापेक्षां जो हल्लीं नवीन करार झाला, त्यामध्यें त्याचें स्वातंत्र्य कमी झालें.

१९. इंग्रेज लोकांस बाजीरावसाहेब ह्याजपासून नवीन करार करून घेण्याचें काय कारण झालें?

त्याचें कारण असें झालें कीं, बाजीराव साहेब छपावून नवीन फौज ठेवूं लागला. आणि हिंदुस्थानांतील दुसरे राजे रजवाडे ह्यांनीं इंग्रेज लोकांचा नाश करण्याविषयीं उद्युक्त व्हावें ह्मणून प्रयत्न करूं लागला.

२०. त्या वेळेस हिंदुस्थानांत काय चाललें होतें?

त्या वेळेस इंग्रेज लोकांचा मुख्य अधिकारी जो गवर्नर जनरल साहेब हा पेंढाऱ्यांचा दंगा मोडण्याकरितां त्यांशीं लढाई करीत होता.

२१. बाजीराव साहेब ह्यानें इंग्रेज लोकांशीं लढाई करण्याविषयीं कोणती संधी पाहिली होती?

घोडनदी येथें इंग्रेज लोकांची फौज होती ती पेंढाऱ्यांचें

पारिपत्य करावयाकरितां हिंदुस्थानांत जाऊं लागली;
संधी पाहून बाजीराव साहेब इंग्रेज लोकांशीं लढाई
लागला.

२२ त्या लढाईविषयींचें कसकसें वर्णन आहे?

उत्तरः—

ती लढाई इसवी सन १८१७ चे नोवेंबर महिन्याचे पांचव्या तारखेपासून चालूं लागली, बाजीराव साहेब ह्यानें ज्या बापू गोखल्याचे स्वाधीन आपली फौज केली होती त्या बापू गोखल्यानें कांहीं फौज बरोबर घेऊन इंग्रेज लोकांवर जाऊन खडकी मुकामीं हल्ला केला; परंतु कांहीं काळपर्यंत युद्ध होऊन शेवटीं मराठे लोकांचें धैर्य नष्ट झालें. लढाईचें वर्तमान जनरल स्मिथ साहेब ह्यानें ऐकून तो जी इंग्रेज लोकांची फौज पेंढाऱ्यांवर पूर्वी गेली होती ती आपल्या बरोबर घेऊन पुण्या कडेस परत यावयास निघाला. त्यानंतर नोवेंबर महिन्याच्या सत्रावे तारखेस पेशव्याचे लोक इंग्रेज लोकांबरोबर एकही लढाई न करितां तेथून पळून गेले. पुढें कांहीं दिवस पर्यंत पळतां पळतां बाजीराव साहेब इसवी सन १८१८ चे जून महिन्याच्या तिसरे तारखेस, मालकम साहेब ह्यास शरण जाऊन प्रतिवर्षी आठ लक्ष रुपये ठरावून घेऊन संपूर्ण राज्य सोडून द्यावयास कबूल झाला. इंग्रेजांनीं बाजीराव साहेब ह्यास राहावयाकरितां ब्रह्मावर्त म्हणून जो भागीरथीच्या कांठीं गांव आहे तेथें जागा नेमून दिली.

२३. इंग्रेज लोकांनीं साताऱ्याचे राजास कोणत्या ठिकाणीं धरिलें?

इंग्रेज लोकांनीं अष्टे गांवच्या मुक्कामीं मराठयांच्या छावणीवर अकस्मात् छापा घालून तेथें साताऱ्याच्या राजास धरिलें. छाप्यामध्यें बापू गोखला मारला गेला.

२४. बाजीराव साहेब पळून गेला त्यावेळेस कोणती विशेष लढाई झाली?

बाजीराव साहेब पळून गेला त्या वेळेस त्याचें सैन्य भीमेच्या कांठीं कोरेगांव येथें छावणी करून राहिलें होतें. इतक्यांत इंग्रेजांचें एक पलटण आणि चाळीस इंग्रेजी गोलंदाज शिपाई दोन तोफा घेऊन पुण्याकडे येत होते, ते त्या मुक्कामीं बाजीरावसाहेब ह्याच्या फौजेस आढळले, तेव्हां तत्काळ लढाई होऊं लागली, आणि इंग्रेजी फौजेनें गांवांत शिरून मोठया धैर्यानें आपलें संरक्षण दिवसभर करून पेशव्यांचे फौजेस त्या गांवांत येऊं दिलें नाहीं, परंतु त्या लढाईंत इंग्रेजांकडील लोक सुमारें तीनशें आणि वीस गोलंदाज लोक असे पडले. त्या लढाईचें स्मरण सर्वांस राहावयाकरितां इंग्रेज लोकांनीं ज्या ठिकाणीं ती लढाई झाली होती, त्या ठिकाणीं रणस्तंभ बांधून ठेविला आहे.

२५. बाजीराव साहेब ह्यांचें राज्य इंग्रेज लोकांनीं घेतल्यावर त्यांनीं त्या राज्याचा बंदोबस्त कोणत्या प्रकारानें

निरेच्या पलीकडचा जो प्रदेश तो त्यांनीं साताऱ्यच्या राजास नेमून दिला, आणि बाकीचा संपूर्ण प्रदेश त्यांनीं आप त्याकडेस ठेविला. एल्फिन्स्तन साहेब जो पूर्वीं पेशव्यांच्या राज्यांत इंग्रेजांकडून वकील होता, तोच जिंकिलेल्या प्रांता बंदोबस्त करण्याकरितां नेमिला होता. तेनें साहेब फ चतुर व मराठी राज्याचा माहितगार होता. त्यानें अ बंदोबस्त केला कीं, पेशवे सरकारच्या पदरचे सरदार, मुत्स व आश्रित वगैरे ह्यांस आपला धनी गेल्याचें दुःख न व्हा वें, आणि त्यांचा प्रतिष्ठितपणानें निर्वाह होऊन अब्रू काय राहावी, म्हणून कित्येकांस जाहागिरि दिल्या, व कितीए लडे लोकांस पेनशनें करून दिलीं, व कितीएकांस वर्षासं करून दिलीं. तसेंच, इनामें, देवस्थानें, व धर्मादाय खर्च जसे पहिल्यापासून चालत आले त्याप्रमाणें पुढें चालविले, आणि लहान सहान बंडें मोडून टाकून रयतेस पहिल्यापेक्षां सुख होण्यासाठीं न्याय मनसुबी चांगली व्हावी, व कोणावर जुलूम जास्ती होऊं नये, असा बंदोबस्त करून ठेविला. त्याप्रमाणें अद्यापि चालला आहे. त्या साहेबानें लोकोपकारार्थ जीं मोठमोठीं कृत्यें केलीं त्यांचें स्मरण करून लोक अद्यापि त्याची कीर्ति गात आहेत.

समाप्त.